

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व
विशेष सहाय्य विभाग
कृती सर्वागीण प्रगतीची...
गाथा सामाजिक समतेच्या निर्मितीची
समता न्याय एकात्मता
यशोगाथा
सिंधुदुर्ग

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा

व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;

दर्जाची व संधीची **समानता** ;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता


यांचे आश्वासन देणारी **बंधुता**

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

**आमच्या संविधानसभेत**

आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी

**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करीत आहोत.**



सत्यमेव जयते

# भारताचे संविधान - कलम ४६ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन

**राज्य, जनतेतील दुर्बल घटक आणि विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन विशेष काळजीपूर्वक करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यांपासून त्यांचे रक्षन करील.**

# मार्गदर्शक



**मा.ना. श्री. एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री



**मा.ना. श्री. देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री (वर्धा)



**मा. ना. श्री. रविंद्र चव्हाण**
सार्वजनिक बांधकाम, अन्न आणि नागरी पुरवठा,
ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य
तथा पालकमंत्री सिंधुदुर्ग.



**मा.ना. श्री.सुमंत भांगे (भाप्रसे)**
सचिव, सामाजिक न्याय व
विशेष सहाय्य विभाग



**मा.ना. श्री. प्रशांत नारनवरे (भाप्रसे)**
आयुक्त, सामाजिक न्याय व
विशेष सहाय्य विभाग



**मा. वलसा नायर सिंह**
मा. पालक सचिव, सिंधुदुर्ग



**मा. के. मंजुलक्ष्मी (भा.प्र.से.)**
मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग



**मा. प्रजित नायर (भा.प्र.से.)**
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदुर्ग



**मा.श्रीम. वंदना कोचुरे**
प्रादेशिक उपायुक्त,
समाज कल्याण मुंबई विभाग मुंबई.



**श्री. प्रमोद जाधव**
उप आयुक्त, समाज कल्याण
जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,
सिंधुदुर्ग



**श्री. संतोष चिकणे**
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण सिंधुदुर्ग



**श्री. संतोष भोसले**
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
सिंधुदुर्ग (अति.कार्यभार)

# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सिंधुदुर्ग कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना तसेच नाविन्यपूर्ण व वैशिष्टयपूर्ण योजनांची यशोगाथा

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सिंधुदुर्ग कार्यालय.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सिंधुदुर्गनगरी.



# मनोगत

महाराष्ट्र राज्य, पुणे समाजातील दुर्बल घटक अनुसूचित जाती मध्ये समाविष्ट असणा - या घटकांचा आर्थिक विकास करून समता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४६ अन्वये राज्यांवर सोपविलेली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने राज्याचा सामाजिक न्याय विभाग कार्यरत आहे. यासाठी दुर्बल घटकांच्या विकासासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांसंबंधीच्या मार्गदर्शिका महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण आयुक्तालयामार्फत प्रकाशित करण्यात येत आहेत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सदर योजनेची माहिती सहज सुलभ भाषेत आकर्षक मांडणी करून या मार्गदर्शिकेमार्फत देण्यात आलेली आहे . ही मार्गदर्शिका प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांना ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी व योजनेमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी उपयोगी पडणार आहे . शिवाय सर्व सजग नागरिक व जे ह्या योजनेसाठी पात्र आहेत अशा समाजातील दुर्बल व वंचित घटकांना देखील यातील बहुआयामी माहिती अत्यंत मोलाची ठरेल याबाबत माझ्या मनात यत्किंचितही शंका नाही.

हार्दिक शुभेच्छा ..........



डॉ . प्रशांत नारनवरे ( भाप्रसे )
आयुक्त, समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य , पुणे



## मार्गदर्शक

समाजातील विषमतेची दरी मिटवत मागास, वंचित अनुसुचित जातीमधील लोकांचा सर्वांगीण विकास करणे, हे सर्वात मोठे आव्हान यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी कार्यक्षम आणि प्रशिक्षित कर्मचारी वर्ग असणे तेवढेच आवश्यक आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या योजना राबविण्याबाबत मा. आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासकीय पातळीवर अनेक बदल करून सामाजिक न्याय विभागाचा कारभार आधुनिक जगाशी सुसंबंधित आणि अधिक गतिमान होण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

त्यामध्ये विशेषत: डेली डिसपोजल, झीरो पेंडन्सी, सहा गठ्ठे पध्दती, कामाचा साप्ताहीक गोषवारा, समृध्द अभिलेख कक्षाची निर्मिती, अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षण तसेच नागरिक उन्मुख प्रशासकीय गतिमानता अभियान, कर्मचाऱ्यांसाठी कौशल्य आणि क्षमतावृध्दी अभियान असे विविध उपाय योजले आहेत. अशा विविध उपायांद्वारे समाजकल्याण विभागाला गतिमान आणि अधिक तत्पर बनविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.



**मा.श्रीम.वंदना कोचुरे**
प्रादेशिक उपायुक्त,
समाज कल्याण मुंबई विभाग मुंबई.

## प्रस्तावना



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द घटक तसेच दुर्बल घटक यांच्याकरीता सामाजिक, आर्थिक तसेच शैक्षणिक योजना सिंधुदुर्ग जिल्हयात राबविण्यात येतात. सदर योजना शासनाने विहीत केलेल्या शासन निर्णय,परिपत्रक यांचे नियमावलीनुसार राबविण्यात येत आहेत. सामाजिक न्याय विभागामार्फत विशेष बाबी अंतर्गत नाविण्यपूर्ण / वैशिष्टयपूर्ण तसेच स्थानिक जिल्हा पातळीवर मार्गदर्शक तत्वानुसार राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण योजनाव्दारे सामान्य नागरीकांचा प्रशासनावर विश्वास निर्माण होत आहे.

तसेच सदर योजनेची माहिती सर्व नागरीकांपर्यंत पोहचविण्यासाठी समतादूत, सामाजिक प्रसार माध्यम व आकाशवाणी केंद्र सिंधुदुर्ग यांच्यामार्फत समाज कल्याण विभागाच्या योजनांची जाहिरात करण्यात येत आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या योजनांची माहिती यशोगाथा पुस्तक संग्रह स्वरुपात प्रसिद्ध करण्याची संकल्पना मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची आहे.



**श्री. संतोष चिकणे**
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण सिंधुदुर्ग

## *** योजनेची यशोगाथा ***


## जिल्हा :- सिंधुदुर्ग.

### ❖ सिंधुदुर्ग जिल्हाविषयी :-

- जिल्हा मुख्यालय : सिंधुदुर्गनगरी नवनगर विकास प्राधिकरण, सिंधुदुर्गनगरी (ओरोस).
- भौगोलिक क्षेत्र : ५२०७०० हेक्टर असून यापैकी जंगलव्यापत क्षेत्र ११.०३ टक्के आहे.
- उपविभाग : ०३ - कणकवली, कुडाळ व सावंतवाडी.
- तालुके : ०८ - कणकवली, कुडाळ, सावंतवाडी, वेंगुर्ला, मालवण, देवगड, वैभववाडी व दोडामार्ग.

### ❖ स्थानिक स्वराज्य संस्था :

- ग्रामपंचायत संख्या : ४३१
- पंचायत समिती : ०८
- नगरपंचायत : ०५
- नगरपरिषद : ०३
- लोकसभा मतदारसंघ (रत्नागिरी-सिंधुदुर्ग) : ०१
- विधानसभा मतदासंघ : ०३




### ❖ लोकसंख्या

- सिंधुदुर्ग जिल्हयाची एकूण लोकसंख्या : ८४९६५१
- शहरी लोकसंख्या : १२.५९ टक्के
- ग्रामीण लोकसंख्या : ८७.४१ टक्के
- एकूण साक्षरता : ८५.६ टक्के
- शहरी लोकसंख्या : ९२.१ टक्के
- ग्रामीण लोकसंख्या : ८४.६ टक्के


### ❖ सामाजिक रचना :

- अनु. जाती लोकसंख्या : ६.५४ टक्के (५५५८६)
- अनु. जमाती लोकसंख्या : ०.८२ टक्के (६९७६)
- महाराष्ट्र राज्याच्या ०.७५ टक्के लोकसंख्या सिंधुदुर्ग जिल्हयातील आहे.
- ग्रामीण व शहरी भागातील अनु. जातीच्या वस्त्यांची संख्या - ६२१.

| सिंधुदुर्ग जिल्हयाची एकूण लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार | त्यापेकी एकूण पुरुष | एकूण स्त्रिया | ग्रामीण लोकसंख्या | नागरी लोकसंख्या | दर चौ. कि.मी. लोकसंख्येची घनता | स्त्री पुरुष प्रमाण एकूण | एकूण साक्षरता | मानव विकास निर्देशांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८४९६५१ | ४१७३३२ | ४३२३१९ | ८७.४१ | १२.५९ | १६३ | १०३६ | ८५.६ | ०.७५३ |

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | मागासवर्गीय लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) | | | | | | शा.व.गृ संख्या | अनु. वसतिगृह संख्या | दलित वस्त्याची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु. जाती | | | अनु. जमाती | | | | | |
| | | एकूण | पुरूष | स्त्रिया | एकूण | पुरूष | स्त्रिया | | | |
| १ | सावंतवाडी | ८३५० | ४११० | ४२४० | १०६१ | ५६१ | ५०० | १ | ० | 81 |
| २ | कुडाळ | १०३९८ | ५०२० | ५३७८ | १८७९ | ९८५ | ८९४ | ० | ० | ११८ |
| ३ | मालवण | ७०१५ | ३४२५ | ३५९० | ७८५ | ३९५ | ३९० | २ | ० | ९४ |
| ४ | देवगड | ७०८१ | ३२८६ | ३७९५ | १००१ | ४९२ | ५०९ | १ | २ | ८३ |
| ५ | वैभववाडी | ३७१२ | १७३७ | १९७५ | २०७ | १०३ | १०४ | ० | ० | ४५ |
| ६ | वेंगुर्ला | ४०१० | १९३६ | २०७४ | ५०५ | २५४ | २५१ | २ | ० | ३२ |
| ७ | कणकवली | ११९३० | ५८२३ | ६१०७ | १२३१ | ६३० | ६०१ | २ | ० | १२१ |
| ८ | दोडामार्ग | ३०९० | १४९३ | १५९७ | ३०७ | १५५ | १५२ | ० | १ | ४७ |
| | एकूण | ५५५८६ | २६८३० | २८७५६ | ६९७६ | ३५७५ | ३४०१ | ८ | ३ | ६२१ |

## तालुकानिहाय अनु. जाती व नवबौध्द प्रवर्गाची लोकसंख्या :




❖ **अनु. जातीतील प्रमुख जाती :** सिंधुदुर्ग जिल्हयात महार, नवबौद्‍ध व चांभार हे अनु. जाती प्रवर्गातील प्रामुख्याने जाती आढळून येतात.

# *** अनुक्रमणिका ***


| अ.क्र. | विषयाचा / योजनेचा तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| | **१. आस्थापना शाखा** | |
| १.१ | झिरो पेंडन्सी | १२ व १३ |
| १.२ | कर्मचारी कल्याण समिती | |
| १.३ | सहा गठ्ठे पध्दत (अभिलेख कक्ष) | |
| १.४ | कालबध्द पदोन्नती (वर्ग क व ड कर्मचारी) | १४ |
| १.५ | मूळ सेवापुस्तक अदयावत करणे | १५ |
| १.६ | लाड पागे समितीच्या शिफारसीनुसार व अनुकंपा नियुक्ती | |
| | **२. शिक्षण शाखा** | |
| २.१ | भारत सरकार शिष्यवृत्ती योजना | १६ व १७ |
| २.२ | मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क (फ्रीशीप) योजना | १८ |
| २.३ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना | १९ |
| २.४ | व्यावसायीक पाठ्यक्रमांशी संलग्न वसतीगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता व विद्यावेतन योजना | २० |
| २.५ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजना | २१ |
| २.६ | सैनिक शाळेतील अनुसूचित जाती विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता योजना | २२ |
| २.७ | समान संधी केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर | २३ व २४ |
| २.८ | इ. ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना | २५ |
| २.९ | इ.८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसुचित जातीच्या विध्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना | |
| २.१० | इ.५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या अनुसुचित जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना | २६ |
| २.११ | इ.८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्य अनुसुचित जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना | |
| २.१२ | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना | २७ |
| २.१३ | आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुला-मुलीसांठी शासकिय वसतिगृह सुरु करणे व त्यांची देखभाल करणे व त्याचे परिक्षण, तसेच संवाद व वाचन प्रेरणा उपक्रम. | २८ ते ३० |
| | **३. विघयो / अजाउयो शाखा** | |
| ३.१ | अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थाना अर्थसहाय्य योजना. | ३१ व ३२ |
| ३.२ | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वंय सहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याचे उपसाधने पुरवठा करणे बाबत. | ३३ |
| ३.३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना | ३४ व ३५ |
| ३.४ | खुल्या व आधुनिक व्यायामशाळा साहित्य खरेदी करणे. | ३६ |
| ३.५ | दुभत्या जनावरांचे गट वाटप | ३७ व ३८ |
| ३.६ | विशेष घटक योजनेतंर्गत नाविन्यपूर्ण व वैशिष्टयपूर्ण योजना | ३९ |
| ३.७ | दलित वस्तींचा विकास करणे | ४० |
| ३.८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना | ४१ |
| | **४. मावक शाखा** | |
| ४.१ | अनुसूचित जाती अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधि. १९८९ अंतर्गत दाखल गुन्हयातील पिडीतांना अर्थसहाय्य देण्याची योजना | ४२ व ४३ |
| ४.२ | तृतीय पंथीयांसाठी विविध कल्याणकारी योजना | ४४ व ४५ |
| ४.३ | आंतरजातीय विवाह योजना | ४६ |
| ४.४ | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी रमाई आवास घरकुल योजना | ४७ ते ५१ |
| | **५. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती सिंधुदुर्ग** | |
| ५.१ | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती सिंधुदुर्ग जात प्रमाणपत्र पडताळणीबाबत अर्ज सादर करतानाची सर्वसाधारण कार्यप्रणाली | ५२ ते ५५ |

# १. आस्थापना

### १.१ झिरो पेंडन्सी :-

सहायक आयुक्त, समाज कल्याण, सिंधुदुर्ग कार्यालयातील सर्व कार्यासनांचे सन २०२०-२१ मध्ये एकूण २१५३ टपाल प्राप्त झाले होते. त्यापैकी कार्यालयातील भरपूर प्रमाणात टपाल प्रलंबित राहत होते. यासाठी अभ्यागतांना समाज कल्याण विभागातील योजनांचा लाभ घेण्याकरिता वारंवार कार्यालयास भेटी दयावे लागत होते. त्यामुळे विभागाच्या कामकाजाबददल अभ्यागतांकडून नाराजी व्यक्त होत होती. परंत, सन २०२१-२२ पासून प्रत्येक आठवडयाला प्रलंबित टपालाचा आढावा घेतला जात असल्याने टपालाची वेळीच्या वेळी निर्गती होत असल्याने प्रलंबित टपालाचे प्रमाण खूपच कमी झाले आहे. त्यामुळे अभ्यागतांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. आज अखेर प्रलंबित टपाल ०९ आहेत. याबाबत प्रलंबित प्रकरणाचा कार्यासनाकडून वेळोवेळी आढावा घेण्यात येत असतो. त्याबाबतची क्षणचित्रे.






**फलनिष्पती :-**

**माहे नोव्हेंबर, २०२२ अखेरची प्रलंबित टपाल सद्यस्थिती :-**

| अ.क्र. | वर्ष | प्राप्त टपाल संख्या | निर्गमित केलेले टपाल संख्या | प्रलंबित टपाल संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २०२०-२१ | १८३८ | १८३८ | ० |
| २ | २०२१-२२ | २१५३ | २१५३ | ० |
| ३ | २०२२-२३ | २२१८ | २२०९ | ९<br>(प्रलंबित टपालावर कार्यवाही सुरु आहे.) |



**अभ्यागतांचे मनोगत :-**



मी. दिक्षा जाधव. रा. देवगड सन २०२१ मध्ये रमाई आवास योजनेअंतर्गत समाज कल्याण कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला होता. तदनंतर मी स्वत: कार्यालयाकडे एकही फेरी न मारता समाज कल्याण कार्यालयाकडून २०२२ मध्ये प्रस्तावास मंजूरी देण्यात आली. माझी आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्याने मला माझ्या कुटुंबासमवेत राहण्याकरिता समाज कल्याण विभागाकडून माझ्या प्रस्तावाची वेळेवर निर्गती केलेमुळे मला घर बांधकाम करणेसाठी निधी देणेत आला. त्याकरिता मी समाज कल्याण विभागाची शतश: ऋणी राहीन व याबाबत आभार मानते.

## १.२ कर्मचारी कल्याण समिती :-

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सिंधुदुर्ग कार्यालय व अधिनस्त वसतिगृहातील वर्ग २ व ३ संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांची या कार्यालयाचे आदेश क्र. सआसक/सिंधु/आस्था-७/कर्मचारी कल्याण/समिती गठीत करणे/७४५/२०२२-२३ दि.३०/०९/२०२२ अन्वये कर्मचारी कल्याण समिती गठीत करण्यात आली आहे. समितीमधील अध्यक्ष व सदस्य यांनी या कार्यालयातील तसेच अधिनस्त वसतिगृहातील विविध सेवाविषयक बाबींचे स्थानिक स्तरावरुन तातडीने निराकरण करण्याचे कामकाज सुरु आहे. सेवाविषयक समस्यांचे निराकरण करताना क्षणचित्रे.



## १.३ सहा गठ्ठे पध्दत (अभिलेख कक्ष) :-

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सिंधुदुर्ग कार्यालयातील सर्व कार्यासनांमध्ये सहा गठठे पध्दती अंतर्गत प्रलंबित प्रकरणे, प्रतिक्षाधीन प्रकरणे, नियतकालिके, स्थायी आदेश नस्ती, अभिलेख कक्षामध्ये ठेवावयाच्या नस्ती व ड वर्गीय कागदपत्रे, सहा गठठे पध्दतीनुसार अदयावत ठेवण्यात आले आहे, सर्व कार्यासनांचे एकूण ३५० गठ्ठे अभिलेख कक्षात ठेवणेत आली आहेत. त्याबाबतची क्षणचित्रे.







## १.४ कालबध्द पदोन्नती (वर्ग क व ड कर्मचारी) :-

कालबध्द पदोन्नतीचा लाभ एकूण २४ कार्यरत तसेच सेवानिवृत्त चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना देण्यात आला आहे. तसेच वर्ग क च्या कर्मचाऱ्यांपैकी ०३ कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती देण्यात आली असून, त्यानुसार वेतननिश्चिती करण्यात आली आहे. वर्ग क ०१ कर्मचाऱ्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग मुंबई. यांना या कार्यालयाचे पत्र क्र. सआसक/सिंधु/आस्था-१/श्रीम. चव्हाण. कनिष्ठ लिपिक/सु.से.आ.प्र.यो.प. लाभ/७६४/२०२२-२३ दि. ०३/१०/२०२२ अन्वये सादर करण्यात आला आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा झाल्याने, कर्मचाऱ्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

### कर्मचाऱ्यांचे मनोगत : श्रीम. कुंदा शांताराम गिरी, कनिष्ठ लिपिक



मी कुंदा शांताराम गिरी, रा. नवनाथ किंजळकर पो.चोचिंदे ता.महाड जि.रायगड येथील रहिवासी असून मी नोकरी निमित्त मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, सावंतवाडी येथील स्वंयपाकी या पदावर काम करीत होते. मी वर्ग ४ मध्ये काम करीत असताना माझी इच्छा होती की, कनिष्ठ लिपीक व्हावी म्हणून मी कार्यालयाची परवानगी घेऊन बाहेरुन शैक्षणिक पात्रता पुर्ण केली व वर्ग ३ मध्ये पदोन्नती होणेकरीता सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सिंधुदुर्ग कार्यालयाने माझा परिपूर्ण प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास वेळेवर सादर केल्याने सेवाजेष्ठता यादीमध्ये नाव समाविष्ट झाले. तद्नंतर मला माहे जून २०२२ मध्ये कनिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नती समाज कल्याण आयुक्तालय स्तरावरून मिळाली. कनिष्ठ लिपीक नियुक्तीमुळे माझ्या कुटुंबाचा आर्थिकस्तर सुधारला. त्यामुळे सामाजिक न्याय विभागाचा व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सिंधुदुर्ग कार्यालयाचा मी कायम ऋणी राहीन.

### कर्मचाऱ्यांचे मनोगत : श्री. नारय्या कोंगलेटी, शिपाई.



मी नारय्या कोटय्या कोंगलेटी. शिपाई, मागासवर्गीय व आर्थिक दृष्टया मुलींचे शासकीय वसतिगृह, कणकवली. या कार्यालयामध्ये कार्यरत असून मला आश्वासित प्रगती योजनेचा पहिला व दुसरा लाभ सन २०२१-२२ मध्ये समाज कल्याण सिंधुदुर्ग कार्यालयाकडून वेळेवर मिळाल्यामुळे, मी माझे कर्ज हप्ते वेळेत अदा करु शकलो तसेच माझ्या मुलीचे लग्नाकरिता त्यापैकी रक्कमेचा वापर करु शकलो. या बद्दल मी समाज कल्याण कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे मनापासून आभार मानतो.

## १.५ मूळ सेवापुस्तक अदयावत करणे :-

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सिंधुदुर्ग कार्यालय व अधिनस्त वसतिगृहातील अधिकारी / कर्मचारी यांची सेवापुस्तकातील नोंदी वेळोवेळी अद्यावत करण्यात येतात.

कर्मचाऱ्याचे मनोगत :



**श्री. शंकर नारायण मळेकर,**
**सेवानिवृत्त शिपाई**

**मी शंकर मळेकर, रा. कुडाळ जि.सिंधुदुर्ग येथील रहिवासी असून समाज कल्याण विभागामध्ये शिपाई या पदावरून नियत वयोमाननुसार सेवानिवृत्त झालो आहे. समाज कल्याण विभागातील विविध उपक्रम अंतर्गत माझे सेवापुस्तकातील नोंदी पुर्ण करणेत येवून मला सेवानिवृत्तीचे लाभ वेळेत मिळाल्यामुळे मिळालेल्या रक्कमेतून मी स्वत : चे घर घेवून त्या ठिकाणी माझ्या कुटुंबासह पुढील आयुष्य आनंदान जगत आहे. त्यामुळे मी समाज कल्याण विभागाचा ऋणी आहे.**

## १.६ लाड पागे समितीच्या शिफारसीनुसार व अनुकंपा नियुक्ती :-

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सिंधुदुर्ग कार्यालयाच्या अधिनस्त वसतिगृहातील सेवानिवृत्त सफाईगारांच्या वारसाना लाड पागे समितीच्या शिफारसीनुसार श्री. नंददिपक जाधव. व श्री. मयूर कदम. या ०२ कर्मचाऱ्यांना रिक्त असलेल्या सफाईगार पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच श्री. नैतिक वाघाटे. यांस या कार्यालयामध्ये रिक्त असलेल्या शिपाई पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात आली आहे.

**कर्मचाऱ्याचे मनोगत : श्री.मयुर चंद्रहास कदम, सफाईगार (लाड पागे समिती शिफारसीनुसार नियुक्ती.)**



मी. मयुर कदम, सफाईगार मु.पो. वेंगुर्लो माझे वडील सन २०१७-१८ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. तद्नंतर समाज कल्याण कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार नोकरी साठी अर्ज सादर करणेत आला. त्यानुसार समाज कल्याण कार्यालयाने वेळेवर कार्यवाही करून वडीलाच्या निवृत्तीनंतर वारसा हक्काने मला सफाईगार या पदावर सन २०२०-२१ मध्ये नियुक्ती दिली. सदर नोकरी मिळाल्यामुळे मी वडीलांचा वैद्यकीय उपचाराकरिता लागणारा खर्च करू शकत आहे. त्यामुळे मी समाज कल्याण विभागाचा अत्यंत ऋणी आहे.

**कर्मचाऱ्यांचे मनोगत : श्री. नैतिक वाघाटे, शिपाई (अनुकंपा नियुक्ती)**



मी नैतिक वाघाटे, शिपाई राहणार कणकवली येथील रहिवासी असून माझे वडील श्री. दिपक वाघाटे यांच्या आकस्मिक निधनाने त्यांचा मुलगा या नात्याने वारस हक्काने मला अनुकंपा तत्वावर समाज कल्याण विभागात शिपाई या पदावर नियुक्ती मिळाली. या अनुकंपा नियुक्तीमुळे मला माझ्या व माझ्या कुटुंबास उदरनिर्वाहाचे साधन मिळाले आहे. त्यामुळे सामाजिक न्याय विभागाचा व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सिंधुदुर्ग कार्यालयाचा मी कायम ऋणी राहिन.

# २. शिक्षण विभाग

## २.१ भारत सरकार शिष्यवृत्ती योजना :

**प्रस्तावना :-**



शासन निर्णय इबीसी - १०९५ / प्र.क्र.६३ / मावक - २ दि.१० नोव्हेंबर १९९६ व इबीसी-२००३ / प्र.क्र.३०१ / मावक-२,दि.०१ नोव्हेंबर २००३ अन्वये व सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग ईबीसी -२०१६/प्र क्र २२१ /शिक्षण -३१ मार्च 2016 अन्वये, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शालांत परिक्षोत्तर शिक्षण घेण्यास प्रोत्साहीत व्हावे व त्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणुन अनुसूचित जाती / नवबौध्द, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या विदयार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या वर्गीकरणानुसार निवासी / अनिवासी विदयार्थ्यांना दरमहा रक्कम शासननिर्णयातील नमूद दराने शिष्यवृत्ती दिली जाते.



सन २०१८-१९ पासून भारत सरकार शिष्यवृत्ती योजना ही महाडिबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत असून मागील व चालू शैक्षणिक वर्षात विदयार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे नवीन अर्ज नोंदणी व नुतनीकरण करणेबाबत वेळोवेळी दैनिक स्थानिक वर्तमानपत्रातून तसेच कार्यशाळा, सामाजिक प्रसार माध्यमातून शिष्यवृत्ती अर्ज भरणेबाबत प्रसिध्दी करणेत येते. सिंधुदुर्ग जिल्हयात एकूण १२१ महाविद्यालये असून अनु. जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे किमान १४०० शिष्यवृत्ती अर्जाची छाननी करून सदरचे अर्ज वरिष्ठ कार्यालयाकडे वेळेवर मंजुरीसाठी सादर केले जातात. या योजनेसाठी विद्यार्थ्यांनी mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर online अर्ज भरणे आवश्यक आहे.

**योजनेचा उद्देश :-**

१. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन / उच्च शिक्षण घेता यावे.

२. विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे.

**लाभाचे स्वरूप :-**

१. विद्यार्थ्यांस निर्वाह भत्ता व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर मान्य बाबींवरील शुल्क प्रदान.

२. अभ्यासक्रमाच्या गटनिहाय रु. २३० ते रु. ४५० या प्रमाणे दरमहा निर्वाहभत्ता.

३. वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रु. ३८० ते रु. १२०० या प्रमाणे दरमहा निर्वाहभत्ता.

### योजने निकष :-

१. विद्यार्थी हा अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील असावा.

२. विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे.


३. विद्यार्थी शालांत परीक्षोत्तर व त्यापुढील शिक्षण घेत असलेला असावा.

४. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

**योजनेची फलनिष्पती :-** सन २०१९-२० ते २०२१-२२ अखेर वर्षनिहाय अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात आलेला लाभाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | शैक्षणिक वर्ष (रक्कम रू.लाखात) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सन २०१९-२० (लाभार्थी संख्या) | खर्च निधी | सन २०२०-२१ (लाभार्थी संख्या) | खर्च निधी | सन २०२१-२२ (लाभार्थी संख्या) | खर्च निधी |
| १ | भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | १०७१ | ७६.७७ | ११७४ | ७४.३२ | १३०६ | ३२.२९ |

मागासवर्गीय व दुर्बल घटकांना सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रिये आणून त्यांचा शैक्षणिक व सामाजिक आर्थिक विकास घडवून आणणे व पर्यायाने त्यांचा सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी सदर योजनेचा लाभ होत आहे.




### लाभार्थ्यांचे मनोगत :-



मी धम्मपाल जाभाडे, श्री. पुष्पसेन डी. फॉर्मसी कॉलेज, डिगस ता. कुडाळ जि.सिंधुदुर्ग या कॉलेजमधून डी. फॉर्मसी प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण झाला असून मला शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला होता. तसेच या वर्षीही मी शिष्यवृत्तीकरीता अर्ज सादर केलेला आहे. माझी आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने शिष्यवृत्ती योजनेमुळे मला शिक्षण घेण्यासाठी फायदा झाला. भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेमुळे माझे शिक्षण पूर्ण होत असल्याने मी समाज कल्याण विभागाचा ऋणी आहे.



मी कु. प्रणाली विद्याधर कानिदे, नांदेड जिल्हयातील असून यशवंतराव भोसले कॉलेज ऑफ फॉर्मसी, सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग या महाविद्यालयात बी. फॉर्मसी या अभ्यासक्रमात शिक्षण घेत असून माझी परिस्थिती बिकट व गरीबीची असून मी सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेवू शकत नसल्याने मला समाज कल्याण विभागाच्या योजनेची शिष्यवृत्ती संदर्भात मार्गदर्शन मिळाले. मला शिक्षणाची आवड असल्याने वैद्यकीय क्षेत्रात का करण्याची इच्छा होती. त्या शिष्यवृत्ती योजनेमुळे मी महाविद्यालयात बी. फॉर्मसी अभ्यासक्रमास प्रवेश घेवून माझे अभ्यासक्रम पूर्ण करीत आहे. त्यामुळे मी समाजकल्याण विभागाची ऋणी राहीन.

## २.२ मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क (फ्रीशीप) योजना :-

**प्रस्तावना-** शालांत परीक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना त्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता अनु. जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न २.५० लाखाच्या पुढे असल्यास फ्रिशीप योजनेचा लाभ देणेत येतो. सर्व जिल्हास्तरावरील मान्यताप्राप्त मॅट्रिकोत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर विहीत कलेले शुल्क देण्यात येते. या योजनेसाठी mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर online अर्ज भरणे आवश्यक आहे.

**योजनेचा उद्देश :-**

१. अनु जाती प्रवर्गातील विद्यार्थाना उच्च व तंत्र शिक्षण तसेच व्यावसायिक शिक्षण घेता यावे

२. विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे.

**लाभाचे स्वरूप :-**


विद्यार्थाना अभ्यासक्रमाच्या वर्गवारीनुसार प्राधिकृत संस्थेने महाडीबीटी पोर्टलवर मंजूर केलेली शिक्षण फी,परीक्षा फी ची प्रतिपूर्ती शासनामार्फत केली जाते.

**योजने निकष :-**

१. विद्यार्थी हा अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील असावा.
२. विद्यार्थी शालांत परीक्षोत्तर व त्यापुढील शिक्षण घेत असलेला असावा.
३. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
४. पालकांचे उत्पन्न २.५० लाखापेक्ष्या जास्त असावे
५. व्याव. अभ्यासक्रमाकरिता प्रवेशित विद्यार्थी कॅप राऊंड मधून प्रवेशित असावा.
६. विद्यार्थ्याकडे जात वैधता प्रमाण पात्र असावे

**योजनेची फलनिष्पती :-** सन २०१९-२० ते २०२१-२२ अखेर वर्षनिहाय अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात आलेला लाभाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | शैक्षणिक वर्ष (रक्कम रू.लाखात) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सन २०१९-२० (लाभार्थी संख्या) | खर्च निधी | सन २०२०-२१ (लाभार्थी संख्या) | खर्च निधी | सन २०२१-२२ (लाभार्थी संख्या) | खर्च निधी |
| १ | शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क (फ्रीशीप) योजना | १०७१ | ७६.७७ | ११७४ | ७४.३२ | १३०६ | ३२.२३ |






**विद्यार्थ्यांचे मनोगत :**

मी सृष्टी सिद्राम देवकुळे, रा.जत जि.सांगली जिल्हयातील रहिवासी असून श्री. पुष्पसेन डी. फॉर्मसी कॉलेज, डिगस ता. कुडाळ जि.सिंधुदुर्ग या महाविद्यालयात बी. फॉर्मसी प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतला होता. माझ्या पालकांचे उत्पन्न जास्त असल्याने शिष्यवृत्ती मिळणार नाही असे समजले. तथापि, मी समाज कलयाण विभागाकडे संपर्क साधला असता फ्रीशीप योजनेबाबत मला मार्गदर्शन करणेत आले. त्यानुसार मी फ्रीशीप शिष्यवृत्ती योजनेचा अर्ज केला व त्याचा लाभ मिळाला. म्हणून मी माझा अभ्यासक्रम पूर्ण करू शकते. त्यामुळे मी समाज कल्याण विभागाची ऋणी आहे.

## २.३ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना :

प्रस्तावना :- अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारावा यासाठी इयत्ता १० वी मध्ये ७५% व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विजाभज व विमाप्र मुला-मुलींसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये दरमहा ३०० रू प्रमाणे १० महिन्याचे ३००० रू. शिष्यवृत्ती अदा करणेत येते.

या योजनेसाठी mahadbt.maharashtra.gov.in या वेबसाईटवर online अर्ज भरणे आवश्यक आहे.

**योजनेचा उद्देश :-**

१. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन/उच्च शिक्षण घेता यावे.

२. विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे.

३. अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारावा व त्यांच्या गणुवत्तेमध्ये वाढ व्हावी, तसेच सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्पर्धेमध्ये ते टिकून रहावेत यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांना सक्षम करण्यांच्या दृष्टीने ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

**लाभाचे स्वरूप :-**

अनु जाती /नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थास इयत्ता ११ वी व इ .१२ वी मध्ये प्रति महिना रु ३०० प्रमाणे १० महिन्याचे रु ३००० महाडीबीटी पोर्टल मार्फत आधार संलग्न बँक खाते वर जमा होतात

**योजने निकष :-**


१. विद्यार्थी हा अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील असावा.

२. इयत्ता १० वी मध्ये ७५% व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. ही शिष्यवृत्ती योजना इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये शिकणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालय अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी आहे.

३.विद्यार्थी शालांत परीक्षोत्तर व त्यापुढील शिक्षण घेत असलेला असावा ४.विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

**योजनेची फलनिष्पती :-** सन २०१९-२० ते २०२१-२२ अखेर वर्षनिहाय अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात आलेला लाभाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | शैक्षणिक वर्ष | | | | (रक्कम रू.लाखात) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सन २०१९-२० | | सन २०२०-२१ | | सन २०२१-२२ | |
| | | लाभार्थी संख्या | खर्च निधी | लाभार्थी संख्या | खर्च निधी | लाभार्थी संख्या | खर्च निधी |
| १ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना | ५९ | १७.१० | ९७ | २९१०० | ७५ | २२५००० |



## २.४ व्यावसायीक पाठ्यक्रमांशी संलग्न वसतीगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता व विद्यावेतन योजना :

**प्रस्तावना :-**

वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमातील महविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती या योजने अंतर्गत वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार रक्कम रू. ५०० ते १००० निर्वाह भत्ता दिला जातो. या योजनेसाठी mahadbt.maharashtra.gov.in या वेबसाईटवर online अर्ज भरणे आवश्यक आहे.

**योजनेचा उद्देश :-**

व्यावयायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयातील वसतीगृहात राहणाऱ्या अनुसूचित जातीचे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीद्वारे मिळणाऱ्या निर्वाहभत्यातुन व्यावसायिक पाठ्यक्रमाची पुस्तके, स्टेशनरी, निवास, भोजन, इत्यादी बाबींचा खर्च भागवू शकत नाहीत. व्याससायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयाच्या वसतीगृहात, शासकीय वसतीगृहात व इतर वसतीगृहात राहतात अशा विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्तीच्या व्यतिरिक्त या योजने अंतर्गत निर्वाह भत्ता अदा केला जातो लाभाचे स्वरूप :-

१) व्यावसायिक पाठ्यक्रमाचे संलग्न वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सरासरी रु.५००/- ते रु.७००/- प्रतिमहा १० महिन्यांसाठी निर्वाहभत्ताव्यावसायिक पाठ्यक्रमात शिक्षण घेणाऱ्या मात्र वसतीगृहाबाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सरासरी रु.७००/-ते रु.१०००/- प्रमाणे १० महिन्यांसाठी आर्थीक सहाय्य दिले जाते.

**योजने निकष :-**

१. विद्यार्थी हा वैद्यकीय / अभियांत्रिकी / पशुवैद्यकीय / कृषी / शिक्षण शास्त्र या अभ्यासक्रमाच्या पदविका / पदवी / पदव्युत्तर शिक्षण नियमित घेणारा असावा.

२. विद्यार्थ्यांचे पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाख पेक्षा कमी असावे.


३. विद्यार्थ्यांने व्यावसायिक पाठ्यक्रमात प्रवेश घेतलेला असावा.

४. लाभधारक विद्यार्थी हा अनु जाती /नवबौद्ध प्रवर्गातील असावा.

५. सद्यस्तिथीत विद्यार्थाना मिळणारा निर्वाह भत्ता अपुरा असून वाढत्या महागाई निर्देशांकानुसार व केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार वाढिव निर्वाह भत्ता मिळावा

**योजनेची फलनिष्पती :-** सन २०१९-२० ते २०२१-२२ अखेर वर्षनिहाय अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात आलेला लाभाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | शैक्षणिक वर्ष (रू. लाखात) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सन २०१९-२० | | सन २०२०-२१ | | सन २०२१-२२ | |
| | | लाभार्थी संख्या | खर्च निधी | लाभार्थी संख्या | खर्च निधी | लाभार्थी संख्या | खर्च निधी |
| १ | व्यावसायीक पाठ्यक्रमांशी संलग्न वसतीगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता व विद्यावेतन योजना | ७२ | ५.५२ | ३२ | २.६१ | ९३ | ६.८२ |



## २.५ राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजना :

**योजनेचा उद्देश :-** अनु . जाती, नवबौद्ध प्रवर्गाच्या गुणवत्ता धारक विद्यार्थांचा शैक्षणिक विकास करून त्याला स्पर्धेच्या युगात सक्षमपणे पुढे जाणे करीता सहाय्य करणे .

**योजनेचे स्वरूप :-**

१. सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून राज्यात प्रथम आलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांस (म्हणजे संपूर्ण राज्यातून पहिला आलेल्या विद्यार्थी अनुसूचित जाती प्रवर्गाचा असेल तर)...रु. २.५० रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
२. सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक बोर्डामधून प्रथम आलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांस...रु. १.०० रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
३. सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक विभागीय बोर्डाच्या गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या प्रत्येक अनुसूचित जाती, प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांस...रु. ५० हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
४. सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून जिल्ह्यात प्रथम आलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांस...रु. २५ हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
५. सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून तालुक्यामध्ये प्रथम आलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांस...रु. १० हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र.
६. सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक माध्यमिक विद्यालयात व कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत प्रथम आलेल्या अनुसूचित जाती,प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांस...रु. ५ हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र अदा केले जाते

**योजने निकष :-**

१. विद्यार्थी अनुसूचित जाती/नवबौध्द या प्रवर्गातील असावा.
२. अनु जाती प्रवर्गाचा विद्यार्थी १० वी , १२ वी च्या वर्गात सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून राज्यात/ विभागात / जिल्ह्यात / शाळेत प्रथम येणे आवश्यक आहे

**योजनेची फलनिष्पती :-** सन २०१९-२० ते २०२१-२२ अखेर वर्षनिहाय अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात आलेला लाभाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | शैक्षणिक वर्ष (लाखात) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सन २०१९-२० | | सन २०२०-२१ | | सन २०२१-२२ | |
| | | लाभार्थी संख्या | खर्च निधी | लाभार्थी संख्या | खर्च निधी | लाभार्थी संख्या | खर्च निधी |
| १ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजना | ११ | ०.५५ | ११ | १.४५ | ०९ | १.८० |

**विद्यार्थ्यांचे मनोगत :**



मी श्रध्दा बांदेकर, रा.बांदा ता.सावंतवाडी येथील रहिवासी असून सन २०२१-२२ मध्ये माझा सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून विभागीय बोर्डाच्या गुणवत्ता यादी अनु. जाती प्रवर्गामधून प्रथम क्रमांक आल्याने मला रु. ५० हजार रोख व स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र समाज कल्याण विभागाकडून प्राप्त झाले. त्यामुळे मला पुढील शिक्षणासाठी आर्थिक मदत मिळाली. त्याबद्दल मी समाज कल्याण विभागाची ऋणी आहे.

## २.६ सैनिक शाळेतील अनुसूचित जाती विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता योजना :-

**उद्दिष्टे :-**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेश मिळावा, सैन्यदलात भरती होण्याचे विद्यार्थी दशेतच त्यांच्यात निर्माण व्हावे, विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, शौर्य, सांघिक वृत्ती, नेतृत्व, देश भक्ती इत्यादी गुणांची जोपासना होण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे.

**अटी व शर्ती :-**

१. नाशिक, पुणे, सातारा येथील सैनिक शाळांमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांची शिक्षण फी, परीक्षा फी, भोजन, निवास, कपडे, घोडेस्वारी, पॉकेट मनी इत्यादीवर होणाऱ्या संपूर्ण खर्चाची प्रतीपूर्ती करण्यात येते.
२. इतर मान्यताप्राप्त सैनिक शाळांना प्रति विद्यार्थी प्रतिवर्षी १५,०००/- शिष्यवृत्ती देण्यात येते.

**लाभाचे स्वरुप :-**

१. विद्यार्थी ५ वी ते १० वी पर्यंतच्या वर्गात शिकत असलेला असावा.
२. विद्यार्थी मागासवर्गीय अथवा अनुसूचित जाती या प्रवर्गातील असावा.
३. पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.२५००००/- पेक्षा जास्त नसावे.

**योजनेची फलनिष्पती :-** सन २०१९-२० ते २०२१-२२ अखेर वर्षनिहाय अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात आलेला लाभाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | शैक्षणिक वर्ष | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सन २०१९-२० | | सन २०२०-२१ | | सन २०२१-२२ | |
| | | लाभार्थी संख्या | खर्च निधी | लाभार्थी संख्या | खर्च निधी | लाभार्थी संख्या | खर्च निधी |
| १ | सैनिक शाळेतील अनुसूचित जाती विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता योजना | ७ | १.०५ | ५ | ०.७५ | ३ | ०.४५ |

## २.७ समान संधी केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरे राबविणे :-

सिंधुदुर्ग जिल्हयातील एकूण ११७ महाविद्यालयांमध्ये समान संधी केंद्राची स्थापना करणेत आली असून सदर उपक्रमाद्वारे समान संधी केंद्रातील काही महाविद्यालयांमध्ये संबंधित प्राचार्य, शिष्यवृत्ती कर्मचारी व विद्यार्थ्यांना समितीमधील समन्वयक अधिकारी यांनी उपक्रम राबवून महाविद्यालयातील मागासवर्गीय मुला-मुलींना शिष्यवृत्ती, फ्री शिपसह इतर योजना आणि स्पर्धा परीक्षा विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणेत आले.

सदर उपक्रमाद्वारे केंद्र सरकार पुरस्कृत महाडिबीटी वरील ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येणाऱ्या भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना, मॅट्रिकोत्तर शिक्षण फी परिक्षा फी प्रदाने, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती व व्यावसायिक पाठयक्रमाशी संलग्न वसतीगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता योजनेच्या सर्व अटी व शर्ती तसेच विद्यार्थ्यांनी अर्ज नोंदणी व नुतनीकरण करून घेणेबाबत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणेबाबत मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनी प्रोत्साहित करणेत येत आहे.








पुढारी

# विद्यार्थ्यांसाठी 'समान संधी केंद्रे' स्थापन होणार

### शिष्यवृत्ती, फ्री शिप, स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन

**सिंधुदुर्गनगरी : पुढारी वृत्तसेवा**

सामाजिक न्याय विभागाद्वारे जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये 'समान संधी केंद्राची' स्थापना करण्यात येणार आहे. या केंद्रांच्या माध्यमातून महाविद्यालयातील मागासवर्गीय मुला-मुलींना शिष्यवृत्ती, फ्री शिपसह इतर योजना आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनासोबतच उद्योजकता व्यवसाय व रोजगार निर्मितीसाठी मार्गदर्शन करण्यात येणार असल्याची माहिती समाज कल्याण सहायक आयुक्त दीपक घाटे यांनी दिली. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक योजनांचे मार्गदर्शन तसेच त्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व्यासपीठ निर्माण करून याद्वारे महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शासन यामध्ये सुसंवाद साधण्यास मदत होणार असल्याचेही श्री. घाटे यांनी सांगितले.

प्रत्येक महाविद्यालयात किमान एक प्राध्यापक आणि सहायक म्हणून काही विद्यार्थ्यांची मदत घेऊन महाविद्यालयातच समान संधी केंद्र सुरू करण्याच्या सूचना शासनाकडून देण्यात आल्या आहेत. केंद्र सरकार पुरस्कृत भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या सर्व मार्गदर्शक सूचनांमध्येही शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकास आणि व्यवसाय रोजगार निर्मितीच्या दृष्टिकोनातून राज्य सरकारने या केंद्राच्या माध्यमातून उपाययोजना करण्याचे ठरवले आहे. समान संधी केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यात येणार आहे.

सोबतच रोजगार, उद्योजक किंवा व्यावसायिक होण्यासाठी कौशल्य शिक्षण या सर्व बाबींचे सर्वसमावेशक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय आणि इतर सर्व शैक्षणिक संस्थांच्या सर्व महाविद्यालयांमध्ये या स्वरूपाची केंद्रे तत्काळ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येणार आहेत. प्रत्यक्ष महाविद्यालये सुरू नसली तरी प्रत्येक महाविद्यालयामध्ये समान संधी केंद्राची स्थापन करण्यात येणार आहे. त्यासाठी समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती करून व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करण्यात येणे असून, इतर सोशल मीडियाचा वापर करून संबंधित महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांशी समन्वय साधण्यात येईल. जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी या उपक्रमात सहभागी होऊन हा उपक्रम यशस्वी करावा तसेच शिष्यवृत्ती, फ्री शिपसह इतर योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही समाजकल्याण सहायक आयुक्त श्री. घाटे यांनी केले आहे

Sindhudurg Edition
Feb 17, 2022 Page No. 12

## समान संधी केंद्र महाविद्यालयांमध्ये स्थापना करणेत आली आहेत. त्याबाबत महाविद्यालयातील प्राचार्य व कर्मचारी यांचे मनोगत

**मनोगत :**



**प्राचार्य**

**डॉ. राजेंद्रकुमार भुपाल चौगुले, कणकवली कॉलेज कणकवली ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग**

मी श्री. डॉ. राजेंद्रकुमार भुपाल चौगुले, प्राचार्य, कणकवली कॉलेज कणकवली ता.कणकवली आमच्या महाविद्यालयात सुमारे अनु.जाती प्रगवर्गातील ४२० विद्यार्थी प्रवेशित आहेत. सदर विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती योजना व इतर शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज भरणेसाठी नोटीस महाविद्यालयाच्या दर्शनी भागात लावणेत येत होती. तथापि, सन २०२१-२२ पासून समाज कल्याण विभागाने महाविद्यालयात समान संधी केंद्राची स्थापना करून चांगला उपक्रम राबविला आहे. समान संधी केंद्राद्वारे आमच्या महाविद्यालयस्तरावर प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली समन्वयक अधिकारी,समिती प्रमुख,लिपिक, शिक्षक व विद्यार्थी - विद्यार्थीनी प्रतिनिधी यांचा समावेश करणेत आलेला असून याबाबत समाज कल्याण विभागने व्हॉटसअपग्रुप तयार केलेला आहे. तसेच समान संधी केंद्राद्वारे महाविद्यालयस्तरावर याबाबत बैठकी घेण्यात येवून समितीमधील सदस्यांना व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना / फ्रीशीप योजना, स्पर्धा परिक्षाचे मार्गदर्शन व रोजगार निर्मितीसाठी समन्वयक अधिकारी व समाज कल्याण कार्यालयाकडील अधिकारी / कर्मचारी व समतादूत यांच्यामार्फत मार्गदर्शन करणेत येते.

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजने संदर्भात अर्ज भरताना काही अडचणी येत असल्यास व्हॉटसअपग्रुपद्वारे मार्गदर्शन मागविणे सोयीचे झाले असल्याने विद्यार्थ्यांचे समस्यांचे निरासण वेळेवर करणे शक्य होत आहे. समान संधी केंद्राची स्थापना प्रत्येक महाविद्यालयात करणेत येत असल्याने सदर उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना वेळेवर माहिती व मार्गदर्शन देणेबाबत समाज कल्याण विभागाने हा अत्यंत लाभदायक उपक्रम हाती घेतला आहे.



**प्राचार्य**

**समीर बाळकृष्ण तारी**

**माता वैष्णोदेवी कॉलेज ऑफ आर्टस, कॉर्मस व सायन्स ओसरगाव ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग**

मी श्री. समीर तारी, माता वैष्णोदेवी कॉलेज ऑफ आर्टस, कॉर्मस व सायन्स ओसरगाव ता.कणकवली समाज कल्याण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजना व इतर योजनेची माहिती संदर्भात विद्यार्थी - विद्यार्थीनीना अडचणी तसेच स्पर्धा परिक्षा, रोजगार विषयी मार्गदर्शन करीता समाज कल्याण विभागाच्या उपक्रमाद्वारे महाविद्यालयस्तरावर समान संधी केंद्राची स्थापना करणेत आली असून समितीतील सदस्यांचा व्हॉट्सअपग्रुप तयार करणेत आला आहे. याबाबत महाविद्यालयस्तरावर समान संधी केंद्राद्वारे समितीमधील सदस्य व विद्यार्थ्यांची बैठकी घेण्यात येवून शिष्यवृत्ती योजना / फ्रीशीप योजना व रोजगार संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन महाविद्यालयातील समन्वयक अधिकारी व कर्मचारी तसेच समाज कल्याण विभागाकडील अधिकारी / कर्मचारी व समतादूत यांच्यामार्फत मार्गदर्शन करणेत येते. त्यामुळे हा अत्यंत चांगला व प्रभावी उपक्रम समाज कल्याण विभागाने राबविला आहे.

## २.८ इ. ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना

योजनेचा उददेश : गुणवत्ता वाढीकरीता

लाभाचे स्वरुप : प्रति महिना ५० प्रमाणे १० महिन्याचे रु.५००/-

योजनेचे निकष अटी व शर्ती : १. उत्पन्नाची अट नाही, ५० टक्के पेक्षा अधिक गुण. (ऑफलाईन पध्दतीने )

**योजनेची फलनिष्पती :-** सन २०१९-२० ते २०२१-२२ अखेर वर्षनिहाय अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात आलेला लाभाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | शैक्षणिक वर्ष | | |
|---|---|---|---|---|
| | | सन २०१९-२० (लाभार्थी संख्या) | सन २०२०-२१ (लाभार्थी संख्या) | सन २०२१-२२ (लाभार्थी संख्या) |
| १ | इ.५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या अनुसुचित जातीच्या विध्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती | ६९८ | ७१६ | ७२४ |

## २.९ इ. ८ वी ते १०वी मध्ये शिकणाऱ्या अनुसुचित जातीच्या विध्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना

योजनेचा उददेश : गुणवत्ता वाढीकरीता

लाभाचे स्वरुप : प्रति महिना १०० प्रमाणे १० महिन्यासाठी रु.१०००/-

योजनेचे निकष : उत्पन्नाची अट नाही, ५० टक्के पेक्षा अधिक. (ऑफलाईन पध्दतीने)

**योजनेची फलनिष्पती :-** सन २०१९-२० ते २०२१-२२ अखेर वर्षनिहाय अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात आलेला लाभाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **योजनेचे नाव** | **शैक्षणिक वर्ष** | | |
|---|---|---|---|---|
| | | **सन २०१९-२० (लाभार्थी संख्या)** | **सन २०२०-२१ (लाभार्थी संख्या)** | **सन २०२१-२२ (लाभार्थी संख्या)** |
| १ | इ.८ वी ते १०वी मध्ये शिकणाऱ्या अनुसुचित जातीच्या विध्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती | ८८२ | ६२३ | ५९६ |

### २.१० इ. ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या अनुसुचित जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

योजनेचा उददेश : शालेय मुलींची गळती रोखणे

लाभाचे स्वरुप : प्रति महिना ६० प्रमाणे १० महिन्यासाठी रु.६००/-
योजनेचे निकष - : उत्पन्नाची अट नाही, गुणची अट नाही. (ऑफलाईन पध्दतीने)

**योजनेची फलनिष्पती** :-सन २०१९-२० ते २०२१-२२ अखेर वर्षनिहाय अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात आलेला लाभाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | शैक्षणिक वर्ष | | |
|---|---|---|---|---|
| | | सन २०१९-२० (लाभार्थी संख्या) | सन २०२०-२१ (लाभार्थी संख्या) | सन २०२१-२२ (लाभार्थी संख्या) |
| १ | इ.५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या अनुसुचित जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती | ६५७ | ६८५ | ६०४ |

### २.११ इ. ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसुचित जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

योजनेचा उददेश : शालेय मुलींची गळती रोखणे


लाभाचे स्वरुप : प्रति महिना १०० रु. प्रमाणे १० महिन्यासाठी रु.१०००/-

योजनेचे निकष : उत्पन्नाची अट नाही, गुणची अट नाही. (ऑफलाईन पध्दतीने)

**योजनेची फलनिष्पती** :- सन २०१९-२० ते २०२१-२२ अखेर वर्षनिहाय अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात आलेला लाभाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **योजनेचे नाव** | **शैक्षणिक वर्ष** | | |
|---|---|---|---|---|
| | | **सन २०१९-२० (लाभार्थी संख्या)** | **सन २०२०-२१ (लाभार्थी संख्या)** | **सन २०२१-२२ (लाभार्थी संख्या)** |
| १ | इ. ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसुचित जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती | ५८९ | ६३० | ५९६ |

## २.१२.	भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीए.2016-शिक्षण/293.क्र.प्र/ च्या सुधा 2018जून 13.दिनांक/2शासन निर्णयान्वये शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतू शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या तसेच निवास,भोजन व अन्य सुविधा अभावी पुढील शिक्षण घेऊ शकत नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील इयत्ता 11 वी, 12 वी तसेच इयत्ता 12 वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमां मध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात शिक्षण संस्थामध्ये प्रवेश मिळालेल्या विदयार्थ्यांना मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील मुलां-मुलीप्रमाणे देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधाप्रमाणे भोजन, निवास, निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी शहराच्या वर्गीकरणानुसार रक्कम रु.४३०००/- पर्यंत रक्कम विदयार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्या करिता शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केलेली आहे.

**विद्यार्थ्याचे मनोगत :**	**विद्यार्थ्याचे नाव : रवी भुसावळे, शिक्षण : डिप्लोमा इन डी. फॉर्मसी (व्दीतीय वर्ष)**




मी नांदेड जिल्हयातील रहिवासी असून पुढील शिक्षणासाठी सिंधुदुर्ग जिल्हयात श्री. पुष्पसेन सांवत डी. फॉर्मसी, महाविद्यालय, डिगस येथे प्रथम वर्षामध्ये शिक्षण घेत असून मला २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ मिळाला आहे. मला या योजनेमुळे शिक्षण घेण्यास खूप मोठ्या प्रमाणावर मदत झाली आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात राहण्यासाठी रूमभाडे,जेवणासाठी मेस व शिक्षणासाठी पुस्तके खरेदी करण्यासाठी मदत झाली. माझ्या घरची परिस्थिती बिकट होती, तेंव्हा मला डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेबद्दल माहिती मिळाली. सदर योजनेचा लाभ घेण्यसाठी मी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण सिंधुदुर्ग कार्यालय येथे भेट दिली व योग्य ते मार्गदर्शन घेऊनया योजनेसाठी अर्ज केला, संबंधित योजनेमुळे माझ्या शैक्षणिक कामासाठी खूप फायदा झाला यासाठी मी समाज कल्याण विभागाचा आभारी राहील.

**योजनेची फलनिष्पती :-** सन २०१९-२० ते २०२१-२२ अखेर वर्षनिहाय अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात आलेला लाभाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | शैक्षणिक वर्ष | | |
|---|---|---|---|---|
| | | सन २०१९-२० (लाभार्थी संख्या) | सन २०२०-२१ (लाभार्थी संख्या) | सन २०२१-२२ (लाभार्थी संख्या) |
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना | १७ | १३ | २८ |

## २.१३. योजनेचे नाव : आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलामुलीसांठी शासकिय वसतिगृह सुरु करणे व त्यांची देखभाल व त्याचे परिरक्षण करणे




Certificate
This is to certify that the
QUALITY MANAGEMENT SYSTEM
of
B.C. GIRLS GOVERNMENT HOSTEL, VENGURLA
Near Camp Power House, Br. Nath Pai Road, Tal- Vengurla, Dist- Sindhudurg- 416516, Maharashtra, India
has been assessed and found to be in conformance to the requirements of
ISO 9001:2015
This certificate is valid for the following activity:
Providing Hostel Facility to Girls for their Educational Development

Certificate No. : DI-18/0620001

| | |
|---|---|
| Date of initial registration | 20-06-2018 |
| Date of this certificate | 20-06-2018 |
| 1st Surv. Due Before | 04-06-2019* |
| 2nd Surv. Due Before | 04-06-2020 |
| Recertification Due | 19-06-2021 |

Auth Sign

INDRAPRASTHA SYSTEMCERT PVT. LTD.
CB-022-MS


**प्रस्तावना :** सिंधुदुर्ग जिल्हयात मागासवर्गीय मुला मुलीची शिक्षणाची सोय व्हावी, त्यांना उच्च शिक्षण घेता यावे, त्याचप्रमाणे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुलीना विदयालयीन व महाविदयालयीन शिक्षण घेता यावे, यासाठी मागासवर्गीय मुलांची ०३ वसतिगृहे (कणकवली, मालवण, वेंगुर्ला) व मुलींची ०५ (कणकवली, मालवण, वेंगुर्ला, सावंतवाडी, देवगड) या ठिकाणी शासकीय वसतिगृहे सुरु करणेत आले असून कार्यरत आहेत.

अधिनस्त सर्व वसतिगृहामध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय क्र.बीसीएच-२०१८/प्र.क्र./शिक्षण-२ दि.२१ डिंसेबर, २०१८ च्या शासननिर्णयान्वये अनु. जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ८० टक्के आरक्षित जागावर विनामूल्य प्रवेश देण्यात येतो.

**लाभाचे स्वरूप :** १. मोफत निवास व भोजन, अंथरूण- पांघरूण, ग्रंथालयीन सुविधा.
२. शालेय विदयार्थ्यांना प्रतिवर्षी दोन गणवेश.
३. क्रमिक पाठयपुस्तके , वहया, स्टेशनरी इत्यादी.
४. वैदयकीय आणि अभियांत्रिकी विदयार्थ्यांना त्याच्या अभ्यासक्रमानुसार स्टेथोस्कोप, ॲप्रन, ड्रॉईग बोर्ड, बॉयलर सूट व कला निकेतनच्या विदयार्थ्यासाठी रंग, ड्रॉईग बोर्ड, ब्रश, कॅनव्हास इत्यादी.
५. वसतिगृहातील विदयार्थ्यांना त्याच्या दैनदिन खर्चासाठी निर्वाहभत्ता खालीलप्रमाणे देण्यात येतो.

**तालुका पातळीवर — निर्वाह भत्ता दरमहा रू ५००/- व स्वच्छता प्रसाधन रु. १००/- (मुलींकरीता)**

**योजनेचे निकष :**

१. गुणवत्तेनुसार प्रवेश देता येतो.
२. विदयार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा
३. प्रवेशित अनु.जाती विदयार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न २,५०,००० पेक्षा जास्त नसावे.
४. इयत्ता ८ वी व त्यापुढे महाविदयालयीन शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांना प्रवेशासाठी अर्ज करता येईल.

**अर्ज करण्याची पध्दत :** ऑफलाईन (भविष्यात सदर योजना ऑनलाईन पध्द्तीने सुरू करणे आवश्यक आहे.)
**फलनिष्पती :** सन २०१९-२० ते २०२१-२२ अखेर वर्षनिहाय शासकीय वसतिगृहात अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे प्रवेश देण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | शैक्षणिक वर्ष | | |
|---|---|---|---|---|
| | | सन २०१९-२० (लाभार्थी संख्या) | सन २०२०-२१ (लाभार्थी संख्या) | सन २०२१-२२ (लाभार्थी संख्या) |
| १ | आथिकदृष्टया मागासवर्गीय मुला - मुलीसांठी शासकिय वसतिगृह सुरु करणे व त्यांची देखभाल करणे व त्याचे परिक्षण करणे. | ३५७ | ८६ | १४२ |

शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती होणेसाठी विविध प्रसार माध्यमाचा उपयोग करून प्रचार व प्रसिध्दी करणेत येते.


गुरुवार, दि. ३० जून २०२२

शासकीय वसतीगृहात मोफत प्रवेश अर्ज विनामूल्य : शासनाचे आवाहन

सिंधुदुर्गनगरी, २९ जून : सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्गासाठी सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतीगृहामध्ये मोफत प्रवेशाची संधी उपलब्ध झालेली आहे. विद्यार्थी, विद्यार्थीनी, वसतिगृहातील रिक्त असलेल्या जागावर ऑफलाईन (मॅन्युअली) पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. तरी मागासवर्गीय विद्यार्थी, विद्यार्थीनींनी वसतिगृह प्रवेश अर्ज विनामूल्य प्राप्त करून घेण्यासाठी कार्यालयीन वेळेत संबंधित वसतिगृहातील गृहपाल, अधिक्षिका व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, (डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सिंधुदुर्गनगरी, दूरध्वनी क्र.०२३६२-२२८८८२ ) या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त सचिन साळे यांनी केले आहे.

ऑफलाईन प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी शालेय विद्यार्थीसाठी दि. १५ जूलै २०२२ पर्यंत इयत्ता ११ वी व १० वी नंतरचे अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) साठी दि. ३० जूलै २०२२ पर्यंत. बी.ए. / बी.कॉम / बी.एस.सी. १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदविका / पदवी आणि एम.ए. / एम.कॉम / एम.एस.सी. पदवी नंतरचे पदव्युत्तर पदवी / पदविका इ. अभ्यासक्रम (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) साठी दि. २४ ऑगस्ट २०२२ पर्यंत, व्यावसायिक अभ्यासक्रम साठी ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत अर्ज करता येतील.

सन २०२२-२३ प्रवेशासाठी रिक्त असणाऱ्या जागा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, मालवण ०२३६५-२५१३२३ रिक्त असणाऱ्या जागा ४८ आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, कणकवली ०२३६७-२३१३२१ रिक्त असणाऱ्या जागा- ३८ आहेत.डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, वेंगुर्ला संपर्क क्रमांक ०२३६६-२६२४३५ रिक्त असणाऱ्या जागा- ६१ आहेत. मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, मालवण संपर्क क्रमांक-०२३६५-२५१८०३, रिक्त असणाऱ्या जागा-३९ आहेत. मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, कणकवली संपर्क क्रमांक ०२३६७-२३०४५४, रिक्त असणाऱ्या जागा-४३ आहेत मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, सावंतवाडी संपर्क क्रमांक -०२३६३-२७३०९७, रिक्त असणाऱ्या जागा-४० आहेत. मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, देवगड संपर्क क्रमांक - ०२३६४-२६२१७०, रिक्त असणाऱ्या जागा-९० आहेत. मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, वेंगुर्ला संपर्क क्रमांक- ०२३६६-२६२५३४, रिक्त असणाऱ्या जागा-८३ आहेत.

मागासवर्गीय विद्यार्थी, विद्यार्थीनी शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास इच्छुक असतील अशा विद्यार्थ्यांनी वरील वेळापत्रकानुसार ऑफलाईन (मॅन्युअली) पध्दतीने अर्ज संबंधित वसतिगृहांकडून विनामूल्य उपलब्ध करून परिपूर्ण भरून व सर्व कागदपत्रासहित वसतिगृहात सादर करावे, असे आवाहन श्री.साळे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, यांनी केलेले आहे.

एसटी पूर्ववत

तालुक्यात ठिव

वैभववाडी भाजपा

वैभववाडी, २९ जून (प्रतिनिधी)- वैभववाडी तालुक्यातील


दैनिक पुढारी दिनांक १२ जुन २०२२

शासकीय वसतिगृहात रिक्त असलेल्या जागांवर मोफत प्रवेश

सिंधुदुर्ग : पुढारी वृत्तसेवा

सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या शासकीय मुलांचे वसतिगृह, मालवण, कणकवली व वेंगुर्ला तसेच मुलींचे शासकीय वसतिगृह मालवण, कणकवली, वेंगुर्ला, सावंतवाडी, देवगड या ठिकाणी सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात रिक्त असलेल्या जागावर मोफत प्रवेश देण्यात येणार असल्याची माहिती समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त दीपक घाटे यांनी दिली.

शासकीय वसतिगृहात विद्यार्थ्यांना उत्कृष्ट निवास व भोजन, अंथरूण-पांघरूणाची सुविधा, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता, ग्रंथालय, मनोरंजन कक्ष, जिम, अभ्यासक्रमासाठी संगणकासह इंटरनेट वाय-फाय आदी सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येतात.

तरी गरजू मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी प्रवेशाबाबतचे ऑफलाईन (मॅन्युअली) अर्ज संबंधित तालुक्याच्या वसतिगृहातील गृहपाल यांच्याकडून प्राप्त करून आवश्यक कागदपत्रांसह शासकीय वसतिगृहास जमा करावेत.

अधिक माहितीसाठी संबंधित गृहपाल संतोष जाधव (तालुका कणकवली व देवगड), कुणाल इंदलकर (तालुका- मालवण व सावंतवाडी), गोरक्षनाथ जाधव (तालुका- वेंगुर्ला) किंवा सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाशी (०२३६२-२२८८८२) यावर साधावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त दीपक घाटे यांनी केले आहे.

## शासकीय वसतिगृहात संवाद उपक्रम व वाचन प्रेरणा उपक्रम राबविणे :-

सन २०२२-२३ पासून जिल्हास्तरीय कार्यालयाची समिती स्थापित करून अधिनस्त शासकीय वसतिगृहामध्ये संवाद उपक्रम अंतर्गत भेटी देवून प्रवेशित विद्यार्थी-विद्यार्थ्यांची सोयी-सुविधाबाबत व इतर अडचणी विषयक चर्चा करून निरासण करणेत येते.

तसेच विद्यार्थ्यांना वाचनाची आवड व्हावी, यासाठी वाचन प्रेरणा उपक्रम शासकीय वसतिगृहात राबविणेत येतात. (त्याबाबतची क्षणचित्रे.)





## विद्यार्थ्यांचे मनोगत :

**वसतिगृहाचे नाव :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, कणकवली.

विद्यार्थ्याचे नाव :- विष्णू महादेव पाताडे



मी विष्णू महादेव पाताडे, मु. बुधवळे गावठाणवाडी ता. मालवण जि.सिंधुदुर्ग येथील रहिवासी असून इ. ०८ वी ते पदवीपर्यंत शिक्षणाकरीता शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतला होता. वसतिगृहाच्या चांगल्या वातावरणामुळे मी अभ्यासात नेहमी पुढे राहिलो. वसतिगृहातर्फे मिळणारा निर्वाह भत्ता व पुस्तके यामुळे माझ्या शिक्षणाचा आर्थिक बोजा माझ्या घरच्यांवर पडला नाही. वसतिगृहामध्ये चांगल्या प्रकारचे जेवण मिळत असे. सर्व सोई - सुविधा असल्याने शिक्षणात कधीही अडथळा आला नाही. त्यामुळे मी माझे शिक्षण व्यवस्थित पार पाडू शकलो. शिक्षण पूर्ण करून मी सद्या जिल्हा सत्र न्यायलयात अभियोक्ता म्हणून समर्थपणे काम करीत आहे. त्यामुळे समाज कल्याण विभागामार्फत पुरविल्या जाणा-या अशा योजनांमुळे गरीब व होतकरु विद्यार्थी अनेक क्षेत्रामध्ये यशस्वी होत आहेत. मी व्यक्ती:श समाज कल्याण विभागाचा मनस्वी ऋणी आहे.

विद्यार्थ्याचे नाव :- शंकर पवार



माझे मूळ गाव मु. नरडवे ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग मी माझे पदवीधर शिक्षण पूर्ण करण्यासाठी मी समाजकल्यान संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गी मुलांचे शासकीय वसतीगृह, कणकवली या वसतिगृहात प्रवेश घेतला. मला या वसतिगृहाने शिस्त तर शिकवली तसेच आयुष्यातील कठिण वळणावरील स्पर्धात्मक युगातील माझी पायरी मी येथेच शिकलो. मी सद्या पोलीस विभागात कार्यरत असून समाज कल्याण विभागाचा अत्यंत ऋणी आहे.

विद्यार्थीनींचे नाव :- करिश्मा श्रीकांत नागवेकर



माझे मूळ गाव ठाणे जिल्हयातील असून मी १०० मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह, वेंगुर्ला या वसतिगृहात मला शिक्षणासाठी समाज कल्याण विभागाकडून शैक्षणिक सोई-सुविधा उपलब्ध झाल्याने BHMS अभ्यासक्रम पूर्ण केला. सद्या मी ज्युपिटर हॉस्पिटल ठाणे येथे मेडीकल डिपार्टमेंटमध्ये नोकरी करते. त्यामुळे मी समाज कल्याण विभागाचा अत्यंत ऋणी आहे.

# ३. विशेष घटक योजना (राज्यस्तर)

## ३.१ अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थाना अर्थसहाय्य योजना :


**प्रस्तावना :** महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. मासाका-२०१४ / प्र.क्र.-१२३/अजाक-१/दि.०८.०९.२०१४ अन्वये सदर अनु. जाती व नवबौध्द घटकामध्ये बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी ही योजना राबविली जाते. योजनेअंतर्गत सहकारी कायद्यानुसार स्थापन करणेत आलेल्या अनु. जातीच्या सहकारी संस्थेत दिर्घ मुदतीत कर्ज व भागभांडवल उपलब्ध करून देण्याची ही योजना आहे. या योजनेअंतर्गत प्रकल्पाचे मूल्य मर्यादा ०५ ते ०७ कोटी पर्यंत आहे. या योजनेत प्रामुख्याने यंत्रमाग सोसायटया, निटिंग गारमेंट, कापड प्रक्रीया उद्योग शेतमाल प्रक्रिया उद्योग, साखर कारखाने, इ. उद्योग अपेक्षित आहेत.

**फलनिष्पती :**

सिंधुदुर्ग जिल्हयात आज घडीला एकूण ०७ मागासवर्गीय सहकारी संस्था कार्यरत असून त्यापैकी ०१ संस्थेचे उत्पादन सुरु असून अवघ्या काही महिन्यात अजून ०२ सहकारी संस्थेचे उत्पादने सुरु होण्याची अपेक्षा आहे.







**मनोगत :** सामाजिक न्याय विभागाअंतर्गत चालणाऱ्या सिंधुदुर्ग जिल्हयातील अनु.जाती व नवबौध्द घटकांतील सहकारी संस्थाना अर्थसहाय्य देणे योजनेत आमच्या सिंधु विकास शेडयूल कास्ट इंडस्ट्रिल को-ऑप. सोसायटी लि. शिवडाव ता. कणकवली जि.सिंधुदुर्ग या संस्थेस अर्थसहाय्य करून जैविक कोळसा उत्पादन करण्यास प्रोत्साहीत केले.

आज घडीला आमच्या संस्थेत ६० ते ६५ कामगार होते. या संस्थेमध्ये त्यांना रोजगार मिळाल्या मुळे त्यांचे आयुष्य सुख्कर झाले आहे. सामाजिक न्याय विभागाचे ०३ हप्त्यातील अर्थसहाय्य सन २०१७-१८ ला मिळाल्यानंतर जानेवारी, २०२० या वर्षी प्रकल्पात ०३ मशिनरी स्थापित करून उत्पादन सुरु केले आहे. प्रत्येक मशिनरी कडून किमान दर दिवसाला १५० टन जैविक कोळसा उत्पादनाचे ध्येय संस्थेद्वारे निश्चित केलेले आहे. समाज कल्याण विभागाच्या या कल्याणकारी योजनेमुळे आज जवळपास ७० कुटुंबाच्या उपजिविकेचा प्रश्न सुटला असून ते कुंटुंब समाज कलयाण विभागाचे मनस्वी आभार मानते.

सिंधुदुर्ग जिल्हयातील सिंधू विकास शेडयुल कास्ट इंडस्ट्रीयल को-ऑप सोसायटी मर्यादीत, शिवडाव ता. कणकवली या संस्थेचा जैविक कोळसा उत्पादन करण्याचा प्रकल्प मौजे कडावल ता. कुडाळ येथे आहे. सन २०१७-१८ ला अंतिम हप्ता उचल करुन संस्थेने २०२० च्या आसपास हा प्रकल्प सुरु केला. आजमितीस सदर संस्थेमुळे १०० पेक्षा जास्त कुंटूबांचा उपजिवकेचा प्रश्न मिटला आहे. सदर संस्थेचे उत्पादन वाढत असून त्याप्रकल्पात रोजगार मिळालेल्या काही कामगार बंधू-भगिनींशी याबाबत मुलाखत घेऊन चर्चा केली. त्या मुलाखतीचा काही भाग संक्षिप्त स्वरुपात मांडत आहोत.

| | | |
|---|---|---|
| सहाय्यक आयुक्त | :- | नमस्कार, आपल नाव व गांव |
| श्रीम.सुजाता चव्हाण | :- | मी सुजाता चव्हाण मौजे कडावल ता. कुडाळ |
| सहाय्यक आयुक्त | :- | किती दिवसांपासून येथे काम करता ? |
| श्रीम.सुजाता चव्हाण | :- | मागील १८ महिन्यांपासून सतत कामावर आहे. साप्ताहिक सुट्टी वगळता रोज कामाला असते. |
| सहाय्यक आयुक्त | :- | महिन्याला किती वेतन मिळते ? |
| श्री दयानंद पालव | :- | (हसत) पगाराचं काय साहेब, हाताला काम मिळणं महत्वाचं, तसं पाहिलं तर नविन असताना महिन्याला १५,०००/- रुपये मिळायचे. परंतू, दोन महिन्यापासून पगारात वाढ होऊन १७,५००/- रुपये येवढा पगार मिळत आहे. |
| सहाय्यक आयुक्त | :- | या कारखान्याबाबत कुणी सांगितले तुम्हाला ? म्हणजे कसे कळले ? |
| श्रीम.संजीवनी चव्हाण | :- | माझ्या मुलांने पेपर मधील बातमी वाचून सांगितली की, कडावल येथे नविन जैविक कोळसा कारखाना सुरु होणार आहे. तेथे कामगारांची आवश्यकता आहे. त्यानंतर मी आणि माझे मालक (पती) आम्ही दोघेही येथे येऊन कामाबाबत विचारणा केली. त्यावेळी आमचा अनुभव व कामाची गरज बघून आम्हाला कामावर घेतल. कामाला घेतल्याचा कागद आम्हाला दिला. त्यापासून आम्ही येथे कामाला आहोत. |
| सहाय्यक आयुक्त | :- | नेमकं काय काम करता ? |
| श्रीम.रेश्मा कदम | :- | भुस्सा, ऊसाची मळी, कोंबडीची शीट या कच्चा मालापासून जैविक कोळसा निर्माण होतो त्या मशिनवर काम करताना कोळसा बाजुला करणे, मशिनमध्ये कच्चा माल टाकणे असे काम करतो. कारखान्यात सगळया महिला काम करतात व पुरुष मंडळी बाहेरील सर्व काम करतात. |
| सहाय्यक आयुक्त | :- | या प्रकल्पास समाज कल्याण विभागाचे अर्थसाहाय्य मिळालेले आहे, हे तुम्हाला माहित आहे का ? |
| श्री एकनाथ बांदेकर | :- | साहेब, कारखान्याच्या बाहेर तसा बोर्ड लावलेला आहे. समाज कल्याण विभागाने अर्थसहाय्य केले व आमच्या कारखाना मालकांने कारखाना उभा केला म्हणून आमच्या जवळच्या पाच गावांतील १०० पेक्षा जास्त कुंटूंबाचे पोट भरलं जाते. आम्हाला रोजगार उपलब्ध करुन दिल्याबद्दल कारखान्याचे कामगार तुमच्या समाज कल्याण विभागाचे व मालकाचे मनापासून आभार मानतो. |

मुलाखतीतील चर्चा झाल्यानंतर प्रकल्पास भेट देण्यासाठी संस्थेमध्ये गेल्यानंतर मशिनरीमधून जैविक कोळसा उत्पादन सुरु होते. पूरुष कामगार आलेल्या कच्चा मालाची साठवणूक करीत होती. १०० पेक्षा जास्त कुंटूंबाला उपजिविकेकरीता रोजगार मिळाल्यांचे समाधान प्रत्येक कामगारांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते. समाज कल्याण विभागाच्या या योजनेचे सार्थक झाल्याची भावना माझ्या मनात होती.

## ३.२ अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वंय सहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याचे उपसाधने पुरवठा करणे बाबत.

**वर्ष :- २०१५-१६**







**प्रस्तावना :-** अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वंय सहाय्यता बचत गटांना रु.३.५० लाखाच्या कमाल मर्यादेत (९० टक्के शासकीय अनुदान व १० टक्के स्वंय सहाय्यता बचत गटाचा हिस्सा), ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने ( कल्टीव्हेटर किंवा रोटॅव्हेटर व ट्रेलर) यांचा पुरवठा करण्याची योजना शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक - एसटीएस - २०११/प्र.क्र.४३९/अजाक, दिनांक ६ डिसेंबर, २०१२ अन्वये कार्यान्वीत असुन शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक डीसीटी - २३१६ / प्र. क्र. १३३ / का - १४१७, दिनांक ५ डिसेंबर, २०१६ अन्वये वस्तू स्वरुपात मिळणाऱ्या लाभांचे हस्तांतरण रोख स्वरुपात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वंय सहाय्यता बचत गटांच्या आधार संलग्न संयुक्त खात्यामध्ये वर्ग करण्यात येते.

**फलनिष्पती :-** या कार्यालयामार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वंयसहाय्यता पुरुष / महिला बचत गटांना सदर योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

**लाभार्थ्यांचे मनोगत :-**



अध्यक्ष, समता स्वंयसहाय्यता बचत गट मु.पो. असगणी ता.मालवण जि. सिंधुदुर्ग या बचत गटाची सन २०१५-१६ मध्ये प्राप्त झालेल्या उद्दीष्टानुसार सोडत पध्दतीने निवड झालेली आहे.माझ्या बचत गटास व्ही. एस. टी. (ट्रॅक्टर ), ट्रेलर व रोटॅव्हेटर मिळालेले आहे. माझ्या बचत गटास खरीप व रब्बी हंगामात शेती मशागती करीता ट्रॅक्टरचा वापर करुन अंदाजित हंगामी उत्पन्न रु.१,५०,०००/- इतके मिळविले आहे. तसेच उर्वरीत कालावधी मध्ये बचत गटाच्या ट्रॅक्टरला पाणी टँकर जोडुन वापरले असता हंगामामध्ये अंदाजित रु.१,००,०००/- इतके उत्पन्न माझ्या बचत गटाला मिळालेले आहे. त्यामुळे आमच्या बचत गटाचे उत्पन्न वाढले असून माझा व माझ्या बचत गटातील सदस्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. मला वरील योजनेचा लाभ दिल्याबद्दल मी व माझा बचत गट शासनाचा सदैव ऋणी राहील.

समता स्वंयसहाय्यता बचत गट मु.पो. असगणी



**लाभार्थ्यांचे मनोगत :-** अध्यक्ष, या बचत गटाची सन २०१५-१६ मध्ये प्राप्त झालेल्या उद्यीष्टानुसार सोडत पध्दतीने निवड झालेली आहे. माझ्या बचत गटास व्ही. एस. टी. (ट्रॅक्टर ), ट्रेलर व रोटॅव्हेटर मिळालेले आहे. माझ्या बचत गटास खरीप व रब्बी हंगामात शेती मशागती करीता ट्रॅक्टरचा वापर करुन अंदाजित हंगामी उत्पन्न रु.१,००,०००/- इतके मिळविले आहे. तसेच उर्वरीत कालावधी मध्ये बचत गटाच्या ट्रॅक्टरला पाणी टँकर जोडुन वापरले असता हंगामामध्ये अंदाजित रु.९०,०००/- इतके उत्पन्न माझ्या बचत गटाला मिळालेले आहे. त्यामुळे आमच्या बचत गटाचे उत्पन्न वाढले असून माझा व माझ्या बचत गटातील सदस्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. मला वरील योजनेचा लाभ दिल्याबद्दल मी व माझा बचत गट शासनाचा सदैव ऋणी राहील. **(आम्रपाली महिला बचत गट. दाभोले ता.देवगड जि.सिंधुदुर्ग)**

## ३.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना

**प्रस्तावना** :-

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.विघयो-२०१०/प्र.क्र.२६ दि.१३ एप्रिल, २०१७ नुसार विशेष घटक योजनेतंर्गत कृषि विभागाकडून डॉ. बाबासाहेब आंबडेर कृषि स्वावलंबन योजना राबविण्यासाठी निधी दिला जातो.

**उद्देश :- अनु. जातीच्या शेतकऱ्यांना शेतीसाठी विहीर व जुनी विहीर दुरस्ती, विज जोडणी व मोटरपंप देवून कायमस्वरूपी पाण्याचा स्त्रोत उपलब्ध करून त्याद्वारे अनु. जातीतील शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्तर उंचावण्यास मदत करणे.**

**योजनेचे निकष :-** **१. लाभार्थी हा अनु.जाती / नवबौध्द प्रवर्गातील शेतकरी असावा.**

**२. सक्षम अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र आवश्यक आहे.**

**३. लाभार्थ्यांस शेत जमीन किमान ०.४० असणे आवश्यक आहे.**


**४. शेतकऱ्यांचे नावे जमीन धारणेचा ७/१२ व ८ अ चा उतारा असणे आवश्यक आहे.**

**५. लाभार्थ्यांकडे आधारकार्ड लिंक बॅक खाते आवश्यक आहे, तसेच उत्पन्न मर्यादा रु.१.५० च्या आत असणे आवश्यक आहे.**

**योजनेची फलनिष्पती :-** सन २०१९-२० ते २०२१-२२ या कालावधीत अनु.जाती / नवबौध्द प्रवर्गातील शेतकरी लाभार्थ्यांना खालीलप्रमाणे योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | सन २०१९-२० | | सन २०२०-२१ | | सन २०२१-२२ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खर्च निधी रक्कम रू. (लाखात) | लाभार्थी संख्या | खर्च निधी रक्कम रू. (लाखात) | लाभार्थी संख्या | खर्च निधी रक्कम रू. (लाखात) | लाभार्थी संख्या |
| १ | डॉ. बाबासाहेब आंबडेर कृषि स्वावलंबन योजना | १.७२ | ७३ | १.६० | १७३ बाबनिहाय | १.५० | १३५ बाबनिहाय |

अनु. जाती / नवबौध्द शेतकरी घटकांना सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रिये आणून त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास घडवून आणणे व पर्यायाने त्यांचा सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी सदर योजनेचा लाभ होत आहे.



## कामाचे व लाभार्थ्यांचे फोटो :-













**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतंर्गत नवीन विहीरी व जुन्या विहीरीची दुरूस्ती करणेत आली त्याबाबतची क्षणचित्रे.**

## ३.४ विशेष घटक योजनेतंर्गत खुल्या व आधुनिक व्यायामशाळा साहित्य खरेदी करणे.

**प्रस्तावना :-**

व्यायामशाळा विकास अनुदान योजनेअंतर्गत पात्र संस्थामध्ये सामाजिक न्याय विभागाअंतर्गत चालविण्यात येणाऱ्या सर्व शासकीय शाळा, वसतिगृह व शासनाने घोषित केलेली दलित वस्ती शासन निर्णय मधील नियम क्र. २ मधील पात्र संस्थांना व्यायामशाळा बांधकाम करीता रुपये ७.०० लक्ष अनुदान मंजूर करणे व आधुनिक व्यायाम साहित्य खरेदी करणेकरीता रुपये ७.०० लक्ष अनुदान मंजूर करुन शहरी व ग्रामीण भागातील युवक / युवती व इतर नागरिकांचे आरोग्य सदृढ राहण्यासाठी व्यायामाची फार आवश्यकता आहे व युवक व्यसनापासून दुर राहतात.

**योजनेची फलनिष्पती :-**

सदर योजनेअंतर्गत सन २०२०-२१ ते २०२१-२२ या वर्षात ज्या ठिकाणी खुले व्यायामशाळेचे नव्याने स्थापना करणेत आली आहे. त्याठिकाणी आधुनिक व्यायाम साहित्य व खुले व्यायामशाळा खरेदी करुन स्थापित करण्यात आले व सदर योजनेचा लाभ जिल्हयातील खेळाडू, युवक-युवती, वयोवृध्द, महिला, कर्मचारी वर्ग व इतर नागरिकांना घेत आहेत. जगभरात कोविड - १९ विषाणूचा प्रार्दुभाव झाल्यानंतर आरोग्याच्या दृष्टीकोनातून सदर योजनेचा लाभ नागरिक मोठया प्रमाणात घेत आहेत.

- **योजनेची छायाचित्रे :-**







## ३.५ विशेष घटक योजनेतंर्गत दुभत्या जनावरांचे गट वाटप

### प्रस्तावना :-

विशेष घटक योजना (अनुसूचित जाती उपाययोजना) अंतर्गत अनुसूचित जाती, नवबौध्द / अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना स्वयंरोजगाद्वारे उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सदरील योजना सिंधुदुर्ग जिल्हयात राबविण्यात येते.

### योजनेचे स्वरुप (आर्थिक निकष) :-

| अ.क्र. | बाब | किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | २ संकरीत गाई / म्हशीचे गट प्रतिगाय / म्हैस रु. ४००००/- | ८००००/- |
| २ | तीन वर्षाचा विमा | ५०६१/- |
| | एकूण | ८५०६१/- |

या योजनेअंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना २ दुधाळ जनावरांचा गट वाटप करताना ७५ टक्के म्हणजे ६३७९६/- रुपये शासकीय अनुदानात अनुज्ञेय राहील. अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना अनुदाना व्यतिरिक्त् उर्वरीत २५ टक्के रक्क्म स्व्त: उभारावी लागेल. बँक / वित्तीय संस्थेकडून कर्ज घेणाऱ्या (अनुसूचित जाती साठी ५ टक्के लाभार्थी व २० टक्के बँकेचे कर्ज) लाभार्थ्यांना योजनेअंतर्गत प्राधान्य देण्यात येईल.

### लाभार्थी निवडीचे निकष :-

अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांची निवड खालील प्राधान्य क्रमांकानुसार करण्यात येते. (उतरत्या क्रमाने)

१. दारिद्रय रेषेखालील लाभार्थी.
२. अल्प भुधारक शेतकरी (१ हेक्टर पर्यंतचे भूधारक).
३. अल्प भुधारक शेतकरी (१ ते २ हेक्टर पर्यंतचे भुधारक).
४. सुशिक्षित बेरोजगार (रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात नोंद असलेले)
५. महिला बचत गटातील लाभार्थी (अनु १ ते ४ मधील)


### अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे :-


१. फोटो ओळखपत्राची सत्यप्रत.
२. ग्रामपंचायत (नमुना नं. ८ चा उतारा).
३. दारिद्रय रेषेखाली असल्याचा दाखला.
४. ७/१२ व होल्डींग उतारा.
५. जातीच्या दाखल्याची सत्यप्रत.
६. अपत्य दाखला सत्यप्रत.
७. रोजगार स्वयंरोजगार नोंदणी कार्डाची सत्यप्रत.
८. बचत गट सदस्य असल्यास प्रमाणपत्र.

### लाभार्थ्यांचे मनोगत :-

मी सिध्दार्थ पालव येथील पशुपालक आहे. माझी २०२१-२२ मध्ये जिल्हा वार्षिक उपयोजना (विशेष घटक योजना) अंतर्गत ७५ टक्के अनुदानावर मला दोन म्हैस गटासाठी निवड झाली. त्यानंतर मला दोन म्हशी खरेदी करुन देण्यात आल्या. यापुर्वी मी शेती करीत होतो. पुरक व्यवसाय म्हणून मला या म्हैस गटाचा भरघोस फायदा झाला. अगोदर माझे पूर्वी असलेल्या जनावरापासून १० लिटर दुध मिळत होते. सद्यस्थितीत मला सरासरी २० लिटर इतके दुग्धोत्पादन मिळते. तसेच माझ्या पशुधनात वाढ होवून सध्या माझ्याकडे ७ म्हशी आहेत. घरी नियमित दुधाचे उत्पादन असल्यामुळे दैनंदिन आहारात म्हशीच्या दुधाचा समावेश झाल्यामुळे वर्षभरापासून माझ्या कुंटूंबातील सदस्यांचे आरोग्य उत्तम असून कौटूंबिक स्वास्थ ठेवण्यासाठी याचा उपयोग झाला. दुध विक्रितून मिळालेल्या लाभातून मी माझ्या शिक्षणासाठी हातभार लावला. तसेच या जनावारापासून शेतीसाठी शेणखत मिळाले त्यामुळे जमिनीची सुपीकता वाढली. रासायनिक खताचा वापर व खर्च कमी झाला आहे. तसेच शेतीच्या उत्पदनात वाढ झाली असून शेणखत विक्रीमधून आर्थिक फायदा ही होत आहे.

सदर योजनेमुळे माझ्या संपूर्ण कुंटूंबाला पूर्ण वेळ रोजगार उपलब्ध् झाला असून स्वयंपूर्णतेची भावना माझ्या कुंटूंबामध्ये निर्माण झाली आहे.





## ३.६ विशेष घटक योजनेतंर्गत नाविन्यपुर्ण व वैशिष्ट्यपुर्ण योजना :

**सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सिंधुदुर्ग तसेच मागासवर्गीय मुलां-मुलींचे शासकीय वसतिगृह, वेंगुर्ला व मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, देवगड येथे पारेषण संलग्न सौर विद्युत संचाची स्थापना करणे**

प्रस्तावना:-

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सिंधुदुर्ग अंतर्गत ०८ शासकीय वसतिगृह कार्यान्वित आहेत. सदर वसतिगृहामध्ये अंदाजे २५० विद्यार्थी प्रवेशित आहेत. सन २०२१-२२ मध्ये जिल्हा वार्षिक योजना(अनुसूचित जाती उपयोजना) नाविन्यपूर्ण व वैशिष्ट्यपुर्ण योजनेअंतर्गत ०३ शासकीय वसतिगृहे व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालया सिंधुदुर्ग येथे पारेषण संलग्न सौर विद्युत संचाची स्थापना करणेत आलेली आहे.

**योजनेची फलनिष्पती:-**

०३ शासकीय वसतिगृहे व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयामध्ये पारेषण संलग्न सौर विद्युत संचाची स्थापना करणेत आल्याने वसतिगृहात विद्यार्थ्यांना कायमस्वरूपी विजेची व्यवस्था झाली आहे. विद्युत सोयीमुळे विद्यार्थी अभ्यास करु शकतो ज्यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती होण्यास मदत होईल.

**योजनेचे फोटो:-**







संबंधित वसतिगृहे व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सिंधुदुर्ग येथे पारेषण संलग्न सौर विद्युत संचाची स्थापना करणेत आलेचे क्षणचित्रे.

## ३.७ योजनेचे नाव : अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे

**प्रस्तावना व उद्देश :-**

अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी प्रत्येक अनुसुचित जाती व नवबौध्द वस्त्यांमध्ये नळ पाणीपुरवठा करणे गटारे, स्वच्छता विषयक सोयी सुविधा, जोडरस्ते अंतर्गत रस्ते, समाजमंदिर इत्यादी पायाभूत व्यवस्था करून वस्तींचा सर्वांगिण विकास करणे

**लाभाचे स्वरूप:-** शासन निर्णय दि. ०५ डिसेंबर २०११ अन्वये लोकसंख्येच्या निकषानुसार प्रत्येक अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीला लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदान देण्यात येते.

| अ.क्र. | लोकसंख्या | अनुदान रू |
|---|---|---|
| १ | १० ते २५ | २ लक्ष |
| २ | २६ ते ५० | ५ लक्ष |
| ३ | ५१ ते १०० | ८ लक्ष |
| ४ | १०१ ते १५० | १२ लक्ष |
| ५ | १५१ ते ३०० | १५ लक्ष |
| ६ | ३०१ च्या पुढे | २० लक्ष |

सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये दलित वस्त्यांची संख्या ६२१ असून बृहत आराखडयामध्ये नमूद असलेल्या कामांचा प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह संबंधित ग्रामपंचायतीने तयार करून गट विकास अधिकारी यांचे मार्फत जिल्हापरिषद समाजकल्याण कार्यालयात सादर करण्यात येतात.





**अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेतंर्गत समाज मंदिर व रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.**

## ३.८ डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना

**प्रस्तावना :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु /२०१९/ मुंबई ३२, दिनांक १६ ऑगस्ट २०१९ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत माननीय लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांच्या मंजूरी व निधी वितरणाबाबत कार्यवाही केली जाते.

नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्ती गावांचा विकास करण्यासाठी या घटकांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी कामांना शासन स्तरावरून मान्यता देऊन या योजनेअंतर्गत घ्यावयाची कामे अंमलबजावणी यंत्रणा व इतर निकष निश्चित करण्यासाठी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना अशी राज्यस्तरीय योजना सन २०१८-१९ पासून राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार लोकप्रतिनिधींनी, आमदार, खासदार यांनी सुचविलेल्या नागरी व ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमधील कामांना मान्यता देण्यात येत आहे.


**फलनिष्पत्ती :-** सदर योजनेअंतर्गत सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये सन २०१८-१९ मधील एकूण ०४ कामे पुर्ण करण्यात आली असुन १६ कामे सन २०२१-२२ मधे प्रगतीपथावर आहेत.

सदर योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कामांच्या अनुषंगाने सिंधुदर्ग जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या नागरी वस्त्यांमधील सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्तींशी निगडीत स्थळे तसेच सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्टया महत्तव असलेल्या स्थळांचा विकास करण्याकरिता आवश्यक असलेल्या वाचनालय,अभ्यासिका, धम्मकेंद्र, विपश्यना केंद्र, प्रशिक्षण केंद्र इत्यादी कामांचा समावेश करून जनमानसांचे जीवन सुधारित करण्याची कार्यवाही करण्याबाबतची कामे सुरु आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत काम पुर्ण करण्यात आलेल्या गावाचे नाव - मौजे तळगाव येथील पेडवेवाडी ते बौध्दवाडीकडे जाणा-या रस्त्यावर तसेच आंबेडकर नगरमध्ये दिवाबत्तीची स्ट्रीट लाईटची सोय करणे.

काम मंजूर वर्ष - सन २०१८-१९

काम पुर्ण वर्ष - सन २०२१-२२



# ४. मागासवर्गीय कल्याण योजना (मावक)

## ४.१ अनुसूचित जाती अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ अंतर्गत दाखल गुन्हयातील पिडीतांना अर्थसहाय्य देण्याची योजना

**प्रस्तावना :-** भारतीय राज्यघटनेच्या कलम १७ नुसार कोणत्याही स्वरुपात अस्पृश्यता पाळणे हा कायद्याने गुन्हा ठरविला आहे मात्र अजुनही अस्पृश्यतेच्या / जातीच्या कारणास्तव अनुसूचित जाती व अनुसूचित जामातींच्या व्यक्तीवर अत्याचार केला जातो. या अत्याचारास पायाबंध बसावा, या हेतुने केंद्र शासनाने अनुसूचित जाती अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ व नियम १९९५ पारीत केले. तद्नंतर कालानुरुप या कायाद्यात बदल करुन सुधारीत अधिनिमय , २०१५ व सुधारित नियम २०१६ पारीत केले. सदर कायदा व नियमांचा उल्लेख यापुढे सदर नियम असा करण्यात आला आहे.

कायाद्याची व नियमांची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी. या हेतूने शासनाने विविध विभागांवर जबाबदारी सोपविली आहे. यामध्ये महसुल व वन विभाग, गृह विभाग, सामाजिक न्याय विभाग आणि विधी व न्याय विभाग या विभागांचा समावेश आहे .

सदर कायादयातंर्गत घडणाऱ्या गुन्हयांतील पिडीत व्यक्तींना तात्काळ अर्थसहाय्य देणे व त्यांचे पुनर्वसन करणे ही प्रमुख जबाबदारी सामाजिक न्याय विभाग तसेच महसुल व वन विभागावर आहे. सदर कायदयातंर्गत दाखल गुन्हयात संबंधित विभागामार्फत योग्य प्रकारे कार्यवाही होते किंवा नाही ? याचा आढावा घेण्यासाठी शासनाने राज्यस्तर, विभागीयस्तर , जिल्हास्तर व उपविभागीयस्तरावर विविध समित्या गठित केल्या आहेत. तसेच भारतीय प्रशासकीय सेवेतील सनदी अधिकाऱ्यांची राज्यस्तरीय समन्वय अधिकारी (नोडल ऑफीसर ) म्हणून नियुक्त केली आहे.

**फलनिष्पती :-**

**अनुसूचित जाती व जमाती,अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ आणि नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५ अंतर्गत दि. ०१.०४.१९९५ ते ३०.११.२०२२ अखेर घडलेल्या पोलीस तपासावरील न्यायालयीन दाखल झालेल्या जिल्हानिहाय माहितीचा गोषवारा.**

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | ०१.०४.१९९५ ते ३०.११.२०२२ पर्यत घडलेल्या गुन्हयांची एकूण संख्या | पोलीस तपासात असलेले एकूण गुन्हयांची संख्या | न्यायालयात दिलेल्या गुन्हयांचा तपशील दि.०१.०४.१९९५ ते ३०.११.२०२२ अखेर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शिक्षा झालेल्या गुन्हयांची संख्या | निर्दोष मुक्तता झालेल्या गुन्हयांची संख्या | न्यायालयात प्रलंबित गुन्हयांची संख्या | पोलीस तपासात फायनल रिर्पोट केलेले गुन्हयांची संख्या |
| १ | सिंधुदुर्ग | १७४ | २ | ५ | ११२ | ३८ | १७ |

**पीडीत लाभार्थ्यांस देणेत आलेल्या अर्थसहाय्य लाभाविषयी माहिती**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक)अधिनियम,1989

परिशिष्ट - ब

दि.1 एप्रिल, 2018 ते दि. 31 मार्च 2021 अखेर प्राप्त तरतूद, झालेला खर्च व शिल्लक तरतूद बाबत माहितीचा तपशील

| क्र | जिल्हा | वर्ष | प्राप्त तरतूद (लाखात) | खर्च (लाखात) | शिल्लक तरतूद (लाखात) | लाभार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | एकूण (7+8) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | सिंधुदूर्ग | 1 एप्रिल 2018 ते 31 मार्च 2019 | 12.18 | 12.18 | 0 | 4 | 0 | 4 |
| 2 | | 1 एप्रिल 2019 ते 31 मार्च 2020 | 3.00 | 3.00 | 0 | 7 | 1 | 8 |
| 3 | | 1 एप्रिल 2020 ते 31 मार्च 2021 अखेर | 12.06 | 12.06 | 0 | 7 | 1 | 8 |
| एकूण | | | 27.24 | 27.24 | 0 | 18 | 2 | 20 |

सदर योजना एप्रिल १९९५ या आर्थिक वर्षापासून सुरु करण्यात आली. अनुसूचित जाती / जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अंतर्गत दाखल गुन्हयाच्या प्रकारानुसार व शासन निर्णय दिनांक २३ डिसेंबर २०१६ मधील नमूद तरतूदींच्या अनुषंगाने पिडीत व्यक्तीस एफ.आय.आर. दाखल झालेवर पहिला हप्त्याचे अर्थसहाय्य, दोषारोप दाखल झाल्यावर दुसऱ्या हप्त्याचे अर्थसहाय्य व दोष सिध्दीनंतर उर्वरीत अर्थसहाय्य देण्यात येते. तसेच खुन प्रकणातील मयताच्या वारसास घरकुल उपलब्ध करुन देण्यात येते. व त्याच्या पाल्यास शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात तसेच वारसास शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येते.

**लाभार्थ्याचे मनोगत :**



माझे नाव श्री. सुशील आनंद जाधव मु.पो.झरेबांबर ता. दोडामार्ग जि. सिंधुदुर्ग येथील रहिवासी असून अनु. जाती प्रवर्गातील आहे. माझ्या गावातील रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम सुरु होते. ठेकेदाराला चुकीच्या रस्त्याचे काम करत असल्याचे सांगितले. त्यावेळी इतर आरोपी उपस्थित होते. त्यांनी मला जातीवाचक शिविगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंदविला.

त्यानुसार सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सिंधुदुर्ग कार्यालयामार्फत मला व माझ्या कुटूंबीयांना शासन निर्णयातील नमूद तरतूदीच्या अनुषंगाने अर्थसहाय्य मंजूर करून लाभ दिला. याबाबत मी समाज कल्याण विभागाचा ऋणी आहे.

## ४.२ तृतीय पंथीयांसाठी विविध कल्याणकारी योजना

**प्रस्तावना व उद्देश :-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : तृतीय-२०१८/प्र.क्र.२६/सामासु, दिनांक १३ डिसेंबर, २०१८ या शासन निर्णया नुसार तृतीयपंथीयांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. ज्यामध्ये तृतीयपंथीयांना ओळखपत्र, प्रमाणपत्र तसेच मतदान कार्ड व रेशन कार्ड देणेत येतात. याकरीता स्वयंसेवी संस्थांमार्फत तृतीयपंथीयांना सदरील योजनेची माहिती देण्यात आली. तसेच स्थानीक वृत्तपत्रांमधून प्रचार व प्रसिध्दी करण्यात आली आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये ०६ तृतीयपंथीयांची National Transgender Portal वर नोंदणी करणेत आली आहे. नोंदणी झालेल्या तृतीयपंथीयांना ओळखपत्र व प्रमाणपत्र वाटपासाठी मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रम आयोजित करणेत आला. सदर कार्यक्रमात तृतीयपंथीयांसाठी आरोग्य शिबीर आयोजित करणेत आले तसेच तृतीयपंथीयांना जिल्हा कौशल्य व उद्योजकता केंद्राकडून स्वयंरोजगारासाठी मार्गदर्शन करणेत आले.





मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग, मा. पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग, मा. निवासी उप जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सिंधुदुर्ग यांच्या समवेत तृतीयपंथीय व्यक्तीना ओळखपत्र व प्रमाणपत्र वाटप करताना तसेच तृतीयपंथीयांची आरोग्य तपासणी करतानाची काही क्षणचित्रे.

### तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी समाजकल्याण विभागाचे योगदान : -

योजनेची प्रचार व प्रसिध्दी केल्याने तृतीयपंथीयांना शासनाच्या योजनेची माहिती होत आहे. तसेच तृतीयपंथीयांच्या मनात शासकीय यंत्रणेबाबत विश्वास वाढत आहे. त्याचेच उत्तम उदाहरण म्हणजे सिंधुदुर्ग जिल्हयातील पूर्वीचे श्री. प्रविण वारंग व आत्ताच्या श्रीम. रीया मयुरी आळवेकर या राज्यातील पहिल्या शासकीय तृतीयपंथी शिक्षिका म्हणून मिळालेली नवीन ओळख. श्रीम. रीया आळवेकर या प्रथम पुरूष वेषात शिक्षक म्हणून कार्यरत होत्या. त्यांना एक तृतीयपंथी म्हणून स्त्री वेषात कामकाज करायचे होते परंतु समाज स्वीकारणार नाही या भीतीने त्या एक तृतीयपंथी म्हणून समाजासमोर येत नव्हत्या. त्यांनी आपली ही व्यथा या योजनेमार्फत नोंदणी करणेकरीता या कार्यालयात आले असता सहाय्यक आयुक्त यांचेसमोर व्यक्त केली. त्यांची ही व्यथा मासिक बैठकीमध्ये समितीसमोर मांडली असता मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांनी त्वरीत त्यांची बदली तात्पुरत्या स्वरूपात मा. मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या स्वीय सहाय्यक म्हणून जिल्हापरिषद सिंधुदुर्ग येथे केली. त्यानंतर त्यांची बदली त्यांना हव्या असलेल्या सोयीच्या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत करणेत आली. आता त्यांना समाजात एक तृतीयपंथी शिक्षिका म्हणून न्याय मिळाला आहे.




रिया आळवेकर देशातील पहिल्या तृतीयपंथीय शासकीय शिक्षिका

प्रशासनाच्या भूमिकेने सिंधुदुर्गात लोकशाहीचा विजय : के. मंजुलक्ष्मी, प्रजित नायर यांच्या कृतीला अख्ख्या महाराष्ट्राचा सलाम

- तृतीयपंथी शिक्षिकेला मिळून दिली खरी ओळख
- चक्क दहा वर्षे पुरुषी वेषात त्या करीत होत्या अध्यापन
- तात्पुरत्या कालावधीसाठी सीईओंच्या स्वीय सहाय्यक
- आदर्श शिक्षिका बनून करणार समाजसेवा - रिया यांचा निर्धार

समाजानेही साथ द्यावी!

श्रीम. रीया आळवेकर यांनी आपले मनोगत मुलाखतीद्वारे व्यक्त केले आहे. सदर मुलाखतीची व्हिडीओ लिंक-

https://drive.google.com/file/d/१hn९d७D३LEF_-९k५qpRz९८५Eg०E-k७U४p/view?usp=drivesdk

## लाभार्थ्यांचे मनोगत :-



### " तो चा ती पर्यंतचा प्रवास "

मी रीया मयुरी आळवेकर पूर्वीचा प्रविण वारंग एक तृतीयपंथीय शिक्षक असून गेली दहा वर्ष मी मनाने पूर्ण स्त्री बनून देखील पुरुषी शिक्षक बनून अध्यापनाचे काम करत होती. दरम्यानच्या काळात शस्त्रक्रिया करून शरीराने देखील मी स्त्री बनली. परंतु कागदोपत्री महिला शिक्षक किंवा तृतीयपंथी शिक्षक म्हणून ओळख मिळवण्यात अडचण येत होती.

आपली ही खरी ओळख लपवताना मला प्रचंड मानसिक तान येत होता. जीवन संपवून टाकण्याचे विचार मनात येत होते. त्यातच मला समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या तृतीयपंथी हक्कांचे कल्याण या योजनेबद्दल माहिती मिळाली.

त्या योजनेद्वारे मी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सिंधुदुर्ग या कार्यालयाची भेट घेतली. व तेथील अधिकाऱ्या समोर माझ्या मनाची होत असलेली घुसमट त्यांच्यासमोर मांडली. त्यानुसार मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या अध्यक्षतेखाली तृतीय पंथी तक्रार निवारण समिती समाज कल्याण विभागाकडून स्थापित करणेत आल्याने त्यांनी माझी व्यथा तृतीयपंथी तक्रार निवारण समिती समोर मांडली. सदर समितीवर अशासकीय सदस्य म्हणून माझी नेमणूक करणेत आली. तद्नंतर माझे जीवन पूर्णपणे बदलून गेले. मला एक तृतीयपंथी म्हणून ओळख मिळाली. मला सोयीच्या शाळेमध्ये माझी बदली करून मिळाली जिथे कर्मचारी वर्ग, विद्यार्थी तसेच समाजाने मला एक तृतीयपंथी म्हणून स्वीकारले. अशा प्रकारे माझा तो पासून सुरूवात झालेला प्रवास अखेर ती पर्यंत येऊन थांबला तो केवळ सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सिंधुदुर्ग या कार्यालयामुळेच त्यामुळे मी समाज कल्याण विभागाची ऋणी राहीन.


# ४.३ आंतरजातीय विवाह योजना

**प्रस्तावना व उद्देश :-** अस्पृश्यता निवारण करण्याचा एक भाग म्हणून आंरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक योजना राबविली जाते.

**लाभाचे स्वरूप :-** आंतर जातीय विवाहास रु ५००००/- पती-पत्नीच्या सयुक्त नांवाने धनाकर्ष

**फलनिष्पती : -**

| अ.क्र. | वर्ष | लाभार्थी संख्या | खर्च निधी (लाखात) |
|---|---|---|---|
| १ | २०२१-२२ | ०५ | २.५० |




**लाभार्थ्यांचे मनोगत :-**



मी श्री. चेतन ज्ञानेश्वर जाधव (अनु.जाती) राहणार कारिवडे जाधववाडी ता.सांवतवाडी जि.सिंधुदुर्गमध्ये व श्रीम.प्राजक्ता भिवा सांवत (खुला-स्पृश्य) राहणारी कारिवडे भैरवाडी ता.सांवतवाडी आम्ही दोघानी दिनांक १७/०३/२०२१ रोजी आशीर्वाद मंगल कार्यालय सांवतवाडी ता.सांवतवाडी येथे सामाजिक पध्दतीने विवाहबध्द झालेले आहोत.

आम्हाला घरातून कोणत्याही विरोध झाला नाही. त्यानंतर आम्हाला शासनाच्या आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजनेबाबत समजले त्यानंतर आम्ही समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद सिंधुदुर्गकडे अर्ज दिनांक १२/०४/२०२१ रोजी केला. आम्हाला समाजकल्याण विभागाकडून सन २०२१-२०२२ मध्ये प्रोत्साहनपर अनुदान ५०,०००/- मिळाले. तथापि, सदरची रक्कम आजच्या महागाईच्या दृष्टीने खूपच अल्प प्रमाणात असल्याने संसाराचा उदारनिर्वाह करणे कठीण होत आहे. तरी शासनाकडून रक्कमेत वाढ करणे आवश्यक वाटते. तरी समाज कल्याण विभागातून आम्हाला मिळालेले ५००००/- रक्कमे मुळे आम्हाला त्याची खुप मदत झाली. आम्ही या रक्कमेतून संसारासाठी आवश्यक लागणाऱ्या जिवनावश्क वस्तु खरेदी करणे शक्य झाल्या. याबाबत आम्ही समाज कल्याण विभागाचे फार ऋणी आहोत.

**लाभार्थ्यांचे मनोगत :-**



मी सुरज रामचंद्र रणशूर ( प्रवर्ग - अनु. जमाती) व सौ. गीता सदाशिव स्वामी (प्रवर्ग - खुला) आम्ही सिंधुदुर्ग जिल्हयात राहणारे आहोत. आम्ही दोघंही दि. १९.०३.२०२२ रोजी चौंडेश्वरी मंगल कार्यालय ता. कणकवली येथे सामाजिक पद्धतीने विवाहबध्द झालेले आहोत. आम्ही जाती जातीतील दुरावा संपुष्टात यावा व भविष्यात पुढच्या पिढीने देखील निर्भिडपणे अशा प्रकारचा विवाह करुन समाजाला जागृत करावे यासाठी पाया घालून एक प्रकारची समाज सेवाच करत आहोत. याबद्दल घरातील सर्वांना पटवून दिले. त्यामुळे घरातून या गोष्टीला विरोध झाला नाही. त्यांनतर आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजना शासनामार्फत समाजकल्याण, जिल्हा परिषद मध्ये राबविली जात असल्याचे आम्हाला समजले. त्याप्रमाणे आम्ही जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग या कार्यालयात जाऊन चौकशी करुन अर्ज सादर केला. सदर आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजनेमार्फत आम्हाला समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचकडून ५०,०००/- रुपये अनुदान प्राप्त झाले. सदर अनुदानामुळे आम्हाला संसार गृहपयोगी व जीवनावश्यक वस्तू घेण्यास मदत झाली तसेच आम्हाला मानसिक समाधानही मिळाले. आम्हाला या आर्थिक मदतीने खुप फायदा झाला.त्यामुळे आम्ही शासनाचे व समाज कल्याण विभागाचे सदैव ऋणी आहोत.

## ४.४ अनुसूचित त जाती व नवबौध्द घटकांसाठी रमाई आवास घरकुल योजना

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई शासन निर्णय क्रमांक.बीसीएच-२००९/प्र.क्र.१५९/मावक-२/दिनांक ०९ मार्च २०१० अन्वये ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचित त जाती व नवबौध्द घटकांसाठी सुधारीत घरकुल योजनेस मान्यता देण्यात आलेली आहे.




सदर योजनेअंतर्गत ग्रामपंचायत, नगरपरिषदा व महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द व्यक्तींना पक्की घरे तसेच कच्या घरचे पक्के बांधकाम करता येईल तसेच शासकीय अभिकरणा मार्फत घर खरेदीस विहीत घर किंमत मर्यादेत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. सदर योजनेअंतर्गत अर्जदाराच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा खालील प्रमाणे आहे.

अ. ग्रामीण क्षेत्र : रुपये १.२० लाख

ब. नगरपरिषद क्षेत्र : रुपये ३.०० लाख

क. महानगरपालिका क्षेत्र : रुपये ३.०० लाख

सदर योजनेअंतर्गत घराच्या बांधकामासाठी क्षेत्रनिहाय कमाल खर्चाची मर्यादा पुढील प्रमाणे आहे.

अ. ग्रामीण क्षेत्र : रुपये १,२०,०००-/

ब. नगरपरिषद क्षेत्र : रुपये २,५०,०००-/

क. महानगरपालिका क्षेत्र : रुपये २,५०,०००-/

घराच्या बांधकामाचे चटई क्षेत्र २६९ चौरस फुट राहील.तेवढयाच क्षेत्रासाठी शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील.तथापि लाभार्थी स्वतःच्या मालकीची जागा असेल तर त्यावर त्याच्या मर्जीनुसार अनुदान वापरुन त्यावरील होणारा खर्च स्वखर्चाने जास्त क्षेत्राचे बांधकाम करु शकेल.घराच्या बांधकामाच्या खर्चामध्ये लाभार्थीचा हिस्सा खालील प्रमाणे असेल

अ) ग्रामीण क्षेत्र : निरंक

ब) नगरपरिषद क्षेत्र : ७.५ टक्के

क) महानगरपालिका क्षेत्र : १० टक्के

तथापि दारिद्रयरेषेखालील कुटुंबाला लाभार्थी हिस्सा भरण्याची आवश्यकता नाही.तसेच लाभार्थी स्वतः घरबांधणी करीत असेल तर त्यांनी केलेले श्रमदान ही मजुरी समजुन त्यांच्याकडून हिस्सा घेण्यातून सुट देण्यात आलेली आहे. ग्रामीण भागातील योजना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे मार्फत राबविली जाते तर शहरी भागातील योजना नगरपालिका प्रशासन विभागांतर्गत महानगरपालिका / नगर परिषदामार्फत राबविण्यात येते.

योजनेच्या अटी व शर्ती :-


१. ग्रामीण / शहरी क्षेत्रासाठी लाभार्थी अनुसुचीत जाती व नवबौद्ध संवर्गातील असावा.
   १५ लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील वास्तव किमान वर्षाचे असावे.
२. लाभार्थी हा बेघर असावा किंवा त्याच्याकडे पक्के घर नसावे.
३. योजनेचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीस देण्यात यावा. विभक्त कुटुंब असल्यास रेशनकार्ड विचारात घेण्यात येते.
४. यापूर्वी इतर कोणत्याही गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
५. लाभार्थ्यांचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ग्रामीण क्षेत्रासाठीरुपये १.२० लाखाच्या आत असावे तसेच शहरी व महानगरपालिका क्षेत्रासाठी लाभार्थ्यांचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ३.०० लाखाच्या आत असावे.
६. अनुसूचित त जातीतील पात्र एकही कुटुंब घरकुलापासून वंचित राहू न देणे.
७. राहणीमानाचा दर्जा उंचावणे.

**फलनिष्पती :-**

रमाई आवास योजने अंतर्गत ग्रामीण क्षेत्रा करिता सन २०२१-२२ करिता २५६ उद्दिष्टये मंजूर करण्यात आली असून सदर मंजूर उदिदष्टयानूसार ग्रामीण क्षेत्रातील लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करण्यात आली आहेत. सदर मंजूर घरकुलांपैकी ०५ घरकुलांचे काम पुर्ण झालेले आहे.

❑ **रमाई आवास योजना ग्रामीण क्षेत्र :-**


| अ.क्र. | वर्ष | मंजूर घरकूले | पूर्ण घरकूले | खर्च निधी (लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | २०१९-२० | ३०० | २२१ | ३०३.२५ |
| २ | २०२०-२१ | ० | ० | ० |
| ३ | २०२१-२२ | २५६ | ०५ | ४८.७० |



रमाई आवास योजने अंतर्गत शहरी क्षेत्राकरिता सन २०१९-२० ते सन २०२१-२२ मधील मंजूर करण्यात आलेल्या एकूण १० घरकुलांना सन २०२१-२२ मधे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

❑ **रमाई आवास योजना शहरी क्षेत्र :-**

| अ.क्र. | वर्ष | मंजूर घरकूले | प्रगती पथावर घरकूले | खर्च निधी (लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | २०१९-२० | ३ | ३ | ७.५० |
| २ | २०२०-२१ | ० | ० | ० |
| ३ | २०२१-२२ | ७ | ७ | १७.५० |




लाभार्थ्यांचे मनोगत :- श्री. योगेश विश्वनाथ कदम



दोडामार्ग तालुकयातील सासोली गांवातील श्री. योगेश विश्वनाथ कदम हे लाभार्थि रहिवाशी असून त्यांना दोन लहान मुले आहेत त्यांची परीस्थिती अतिशय हालाकीची असून ते आपल्या मुलांचे शिक्षण तसेच आपले पोट भरण्यासाठी गांवातील इतर लोकांची जमीन भाडे तत्वार घेवून त्या जमिनीमध्ये केळीची लागवड करत. त्यामधून मिळणा-या फायदयातून जमिन मालकांना भाडे देवून उरलेल्या तुटपुंज्या रकमेमध्ये आपल्या मुलांच शिक्षण तसेच पोटा पाण्याला लागणारे साहीत्य खरेदी करुन खात असत.त्यांना स्वत:च पक्के घर आपल्याला बांधता येईल याची त्यांनी स्वप्नात देखिल कल्पना केलेली नव्हती. पण ज्यावेळी सन 2017-18 मध्ये आपल्याला शासना कडून घरकुल मिळू शकत असं त्याना त्यांचे गावातील ग्रामसेवकांनी लक्षात आणुन दिले त्यावेळी त्यांनी पंचायत समिती कार्यालयातील संबधित कार्यासनाकडून घरकूल बाबत माहिती घेतली.

तद्नंतर त्यांनी आपले रमाई आवास योजनेच्या यादीमध्ये आपले नांव समाविष्ट करुन घेणेसाठी ग्रामपंचायतीमध्ये जावुन ग्रामसभेमध्ये उपस्थित राहून रमाई आवास यादीमध्ये नांव समाविष्ठ करुन घेतले. व त्या बाबतचा ठराव ग्रामपचंयतीमार्फत पंचायत समिती कार्यालयाकडे प्राप्त झाले.त्यांचे पुर्विचे गावातील घर हे अर्ध्या मातीच्या भिंती व त्यावरील प्लास्टिक बांधुन भिंत पुर्ण केलेली होती. घरावरील छप्पर हे झावळांचे होते शौचालयासाठी वाडीतील सार्वजनिक शौचालयाचा वापर करावा लागत होता. परंतु पंचायत समितीकडून रमाई आवास योजनेतुन त्यांचे जेव्हा सन 2017-18 मध्ये त्यांच नांव समाविष्ट करण्यात आले. व त्याला जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा सिंधुदूग कडून मंजुरी देवून रमाई आवास योजनेच्या यादीत श्री. योगेश विश्वनाथ कदम यांचे नाव समाविष्ट होवून आले. आणि प्राधान्यक्रम यादीनुसार सन २०१७-१८ मध्ये त्यांचा प्रस्ताव पंचायत समिती दोडामार्ग येथे सादर करण्यात आला. सदरचा प्रस्ताव शासनमार्फत मंजूर झाला त्याला. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रशासकीय मंजूरी आदेश क्रमांक १५१४ दि.३०/०३/२०२१ ने मंजूरी मिळाली. मंजूरी आदेश मिळाल्यापासून एका वर्षाच्या आत श्री. योगेश विश्वनाथ कदम यांनी सदरचे घरकूल टप्या टप्पयाने शौचालयासहित बांधून पूर्ण केले. घरकूल बांधकामासाठी लागणारे शासनाचे अनूदान त्यांना वेळोवेळी प्राप्त झाले तसेच महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सदरील लाभार्थ्याला मंजूरीचे अनुदान देखील प्राप्त झाले. ज्या गरीबीतुन आपण जात होतो त्यात आपण आपल्या या जिवनात स्वत:च्या घरात राहीन अशी कल्पनाही केली नव्हती ते आपल स्पन् शासनाने पुर्ण करुन दिले. त्या बाबत श्री योगेश विश्वनाथ कदम यांनी आपल्या घरात जेव्हा प्रवेश केला त्यावेळी त्यांचे डोळयातील अश्रू पुसत आपण समाज कल्याण विभागाचे आयुष्यभर ऋणी रहाणार असे उदगार काढले.

### लाभार्थ्याचे मनोगत - संदिप सहदेव तळवडेकर



रमाई आवास योजनेअंतर्गत मला घरकुलाचा लाभ दिल्या बददल मी शासनाचा आभारी आहे. या आधी माझे कच्या स्वरुपाचे मातीचे घरकुल होते. समाज कल्याण विभागाने राबविलेल्या उपक्रमामुळे मला पक्या व हक्काच्या घराचे स्वप्न पुर्ण झाले आहे. यासाठी ग्रामपंचायत स्तरावरुन ग्रामसेवक,सरपंच,उपसरपंच, तालुका स्तरावरील सर्व अधिकारी तसेच समाज कल्याण विभागाचे मार्गदर्शन व बहुमुल्य मदत झाल्यामुळे सर्वांचे आभार व कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

लाभार्थ्यांचे मनोगत : श्रीम. माधुरी मुकुंद जाधव, मु.पो.इळये,ता.देवगड,जि.सिंधुदुर्ग

मंजुरीचे वर्ष - सन २०१९-२०

मिळालेले एकुण अनुदान- १,२०,०००/-

नरेगा अनुदान- २०८०८/- (दिवस ८६)

या गटाकडील लाभार्थी श्रीम. माधुरी मुकुंद जाधव रा. इळये यांच्या प्रस्तावाला जिल्हास्तरावरुन दि. १३/११/२०१९ रोजी मान्यता प्राप्त झाल्यानंतर लगेचच घरकुल योजनेच्या बांधकामास सुरुवात करण्याचे आदेश तालुकास्तरावरुन ग्रामपंचायतीला कळवुन लाभार्थ्यास घरकुल बांधकामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यास सांगण्यात आली. त्यानंतर घरकुल बांधकामास लाभार्थ्याने मार्च २०२१ महिन्यामध्ये सुरुवात केली. त्या कालावधीमध्ये समाज कल्याणविभागाकडून मिळालेल्या लाभामुळे व मार्गदर्शनामुळे घरकुल बांधकामाची गुणवत्ता राखण्यास लाभार्थ्यास मदत झाली.





रमाई आवास योजना शासनाने राबविल्यामुळे सर्व सामान्य तळागाळातील लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळत आहे. या योजनेअंतर्गत मला घरकुलाचा लाभ दिल्या बददल मी शासनाची आभारी आहे. या आधी माझे कच्या स्वरुपाचे मातीचे घरकुल होते. शासनाने राबविलेल्या उपक्रमामुळे मला पक्या व हक्काच्या घराचे स्वप्न पुर्ण झाले आहे. त्याच प्रमाणे शासकिय योजनांशी कृतीसंगम असलेल्या योजनेमुळे इत्तर योजनेचा लाभ देखील मला मिळाला आहे. यासाठी ग्रामपंचायत स्तरावरुन ग्रामसेवक,सरपंच,उपसरपंच,तसेच तालुका स्तरावरील सर्व अधिकारी वर्गाचे मार्गदर्शन तसेच समाज कल्याण विभागाकडून बहुमुल्य अशी मदत झाल्यामुळे सर्वांचे आभार व कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

## ५. जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, सिंधुदुर्ग

### ५.१ जात प्रमाणपत्र पडताळणीबाबत अर्ज सादर करतानाची सर्वसाधारण कार्यप्रणाली

१. सर्वप्रथम अर्जदाराने आपले जात प्रमाणपत्र आपल्या मुळ गावी काढावे. सदर जात प्रमाणपत्रामध्ये काही चुक असल्यास त्वरीत संबंधीत कार्यालयाकडून दुरुस्ती करुन घ्यावी. जात प्रमाणपत्रावर संबंधीत कार्यालयाचा गोल शिक्का मारलेला असणे आवश्यक आहे.

२. त्यानंतर www.barti.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत. अर्जदाराने अर्ज करण्यासाठी स्वत:चा इमेल, भ्रमणध्वनी, पत्ता नमुद करुन नोंदणी (रजिस्ट्रेशन) करावी.

३. सदर संकेतस्थळावर कागदपत्रे खरी असल्याबाबत प्रतिज्ञापत्र व वंशावळ प्रतिज्ञापत्र व १५ A नमुना उपलब्ध आहेत. त्यानुसार प्रतिज्ञापत्रे काळजी पुर्वक तयार करावी.

४. अर्जदाराचा फोटो, स्वाक्षरी व पालकांची स्वाक्षरी ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करावी.

५. ऑनलाईन अर्जात योग्य व अचूक माहिती नमुद करावी.

६. १५ A नमुन्यातील प्रमाणपत्रावर प्राचार्य /अधिकारी / यांची स्वाक्षरी व शिक्का घ्यावा.

७. ऑनलाईन अर्ज केल्यावर ३० दिवसाच्या आत समिती कार्यालयाकडे प्रत्यक्ष अर्ज सादर करावा.समिती कार्यालयात अर्ज सादर करतेवेळी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची पाठपोठ प्रत (Both Side Print) जोडावी. यासोबत सर्व मूळ कागदपत्रे व त्यांच्या सुस्पष्ट साक्षांकीत सत्यप्रती विहित क्रमाने जोडावी. सक्षम अधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेली कागदपत्रे जोडावीत.

८. संबंधीत अर्जदाराचे जात प्रमाणपत्र ज्या जिल्ह्यातील सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमीत केले आहे, त्या जिल्ह्यातील जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अर्ज स्वत: किंवा पालकां मार्फत किंवा महाविद्यालयाच्या प्रतिनिधी मार्फत अर्ज सादर करावा. त्रयस्थ व्यक्ती मार्फत अर्ज सादर करु नये.

९. कोणत्याही शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये / जन्म – मृत्यू नोंदीच्या उता-यामध्ये असलेल्या मूळ नोंदींच्या ठिकाणी बदल करू नये. अशा प्रकारचा अनाधिकृत बदल केल्यास आपणाविरुध्द कायदेशीर कारवाई होऊ शकते.

१०. अर्जासोबत सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा क्रम –

अ. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची पाठपोठ प्रत (Both Side Print).

आ. अर्जदाराचे मूळ जात प्रमाणपत्र व त्याची सुस्पष्ट साक्षांकित सत्यप्रत.

इ. अर्जदाराच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित सत्यप्रत.

ई. अर्जदाराच्या वडीलांच्या प्राथमिक शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित सत्यप्रत.

उ. अर्जदारांचे मोठे काका/मोठी आत्या/ आजोबा यांचा शाळा सोडल्याचा दाखला/गाव नमुना नं. १४ इ. ची साक्षांकीत सत्यप्रत.

ऊ. रक्तनातेसंबंधातील नातेवाईकांचे जात वैधता प्रमाणपत्र असल्यास त्याची साक्षांकित प्रत.

ऋ. कागदपत्र खरे असल्याबाबतचे शपथपत्र जोडावे. विद्यार्थी – नमुना क्र. १७, सेवा – नमुना क्र. १९, निवडणुक – नमुना क्र. २१, व इतर म्हाडा, सिडको इ.) - २३

ऌ. नमुना क्र. ३ चे वंशावळ शपथपत्र जोडावे (अर्जदार व अर्जदाराच्या वाडवडीलांच्या नाव / आडनावामध्ये बदल / अपभ्रंश असल्यास वंशावळ प्रतिज्ञापत्र नमुना क्र. ३ मध्ये तसा उल्लेख करावा.)

११. अर्जदाराने आपल्या वाडवडीलांचे सध्या अस्तित्वात असणा-या महाराष्ट्र राज्यातील मानीव दिनांकापुर्वीचे जातनोंद असणारे व कायमस्वरूपी वास्तव्य सिध्द करणारे वर नमुद केलेले पुरावे जोडणे आवश्यक आहे.

| प्रवर्ग | मानीव दिनांक |
|---|---|
| अनुसुचीत जाती (SC) | दि. १० ऑगस्ट १९५० |
| विमुक्त जाती (VJ) व भटक्या जमाती (NT) | दि. २१ नोव्हेंबर १९६१ |
| इतर मागासवर्ग (OBC) व विशेष मागास प्रवर्ग (SBC) | दि. १३ ऑक्टोबर १९६७ |

१२. मानीव दिनांकापूर्वीचा पुरावा म्हणजे काय? याचे पुढील उदाहरण नीट पहावे.

मानीव दिनांकापुर्वीच्या नोंदीना सर्वाधिक महत्व आहे.

उदा. पुरावाधारक – श्री.अनिल बाळकृष्ण कदम, प्रवर्ग इ.मा.व, मानीव दि.१३.१०.१९६७.

| अ.क्र. | तपशील | दिनांक | पुराव्याचे वर्णन | पुरावा मानीव दिनांक पुर्वीचा आहे काय ? |
|---|---|---|---|---|
| १. | जन्मदिनांक | ७/३/१९६० | जन्म दाखला / गाव नमुना नं.१४ | होय |
| २. | प्राथमिक शाळा प्रवेश | १/६/१९६६ | प्राथमिक शाळा सोडल्याचा दाखला | होय |
| ३. | माध्यमिक शाळा प्रवेश | १/६/१९७३ | माध्यमिक शाळा सोडल्याचा दाखला | नाही |
| ४. | शासकीय सेवेत रुजू | २१/२/१९८५ | सेवा पुस्तकातील नोंद | नाही |

१३. अर्जदाराच्या वडीलांच्या शालेय पुराव्यावर शाळा प्रवेश दिनांक हा मानीव दिनांकापुर्वी नसल्यास किंवा त्यामध्ये जातीची नोंद नसल्यास किंवा वडील अशिक्षीत असल्यास पुढीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावीत.

अ. आजोबांचा शाळा सोडल्याचा दाखला / गाव नमुना नं. १४ (जन्म – मृत्यू नोंद उतारा)

किंवा

आ. काकांचा शाळा सोडल्याचा दाखला / गाव नमुना नं. १४ (जन्म – मृत्यू नोंद उतारा)

किंवा

इ. आत्याचा शाळा सोडल्याचा दाखला / गाव नमुना नं. १४ (जन्म – मृत्यू नोंद उतारा)

किंवा

ई. चुलत आजोबा / चुलत काका/ चुलत आत्या शाळा सोडल्याचा दाखला / गाव नमुना नं. १४ (जन्म – मृत्यू नोंद उतारा).

१४. समितीने घेतलेल्या आक्षेपांचे दोन ते सहा आठवडयाच्या आत निरसन करावे लागेल. अन्यथा अपूर्ण अर्ज कारणे नमूद करुन फेटाळले जातील.

➤ ऑनलाईन अर्ज भरताना घ्यावयाची काळजी.

१. सर्व मुळ कागदपत्र व्यवस्थित स्कॅन करुन ऑनलाईन प्रणालीमध्ये अपलोड करावीत. छायांकित प्रती अपलोड करु नयेत.

२. अर्जदाराच्या जात प्रमाणपत्रावरील माहिती ऑनलाईन प्रणालीमध्ये अचुक भरावी.

४ सदरची माहिती आपल्या जात वैधता प्रमाणपत्रावर प्रिंट होणार आहे. त्यामुळे स्पेलिंग मिस्टेक करु नये.

५ मानीव दिनांका पुर्वीचा जातनोंद असणारे जुने कागदपत्र सर्वाधिक महत्वाचे आहे. त्यांची मुळ प्रत स्कॅन करुन अपलोड करावी. व या पुरावाधारकाशी नातेसंबंध स्पष्ट होणारी कागदपत्रे जोडावीत.

५. विद्यार्थ्यांचा जन्मदाखला / प्रमाणपत्र अलिकडील काळातील असल्यामुळे अपलोड करु नये.

६. वैधता प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने ई-मेल वर पाठविले जाणार असल्यामुळे आपला ई-मेल व पासवर्ड नमुद करावा व लक्षात ठेवावा. त्रयस्थ व्यक्तीचा ई - मेल व फोन नंबर देऊ नये.

७. ऑनलाईन जात वैधता प्रमाणपत्रावर अधिकाऱ्यांची डिजीटल अशी ✔ स्वाक्षरी असते. सदर डिजीटल स्वाक्षरीचे प्रमाणपत्र योग्य प्रकारे दिसण्यासाठी Acrobat Reader DC या ॲपमधुन अपलोड करुन घ्यावी.

८. आपल्या प्रस्तावा संदर्भात असणाऱ्या त्रुटी ,आक्षेप, वैधता प्रमाणपत्र बाबत ईमेल व्दारे किंवा पत्राव्दारे सुचित केले जाते.

**टिप :-**

१. पडताळणीची प्रक्रिया करुन समितीला निर्णय देण्यासाठी लागणारा कालावधी ३+२=५ (पाच) महिन्याचा आहे.

२. व्यवसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छीणारे विद्यार्थी यांनी १२ वी विज्ञान शाखेमध्ये शिकत असतानाच प्रत्येक वर्षी ३० नोव्हेंबर पर्यंत समितीकडे अर्ज सादर करण्याच्या सूचना शासनाने दिलेल्या आहेत.

३. त्यामुळे जे विद्यार्थी १२ विज्ञान शाखेत आहेत. असे विद्यार्थी जे सी.इ.टी / निट / जे.इ.इ / नाटा अशा प्रवेश परीक्षा देउन विविध उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छित आहेत. अशा विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर जात प्रमाणपत्र पडताळणीचे प्रस्ताव जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कडे सादर करावेत.

४. अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छीणारे विद्यार्थ्यांनी सी.ई.टी चा फॉर्म भरल्या त्वरीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा अर्ज सादर करावा.


५. अशा प्रकारे अर्ज वेळेवर भरल्यास प्रवेश प्रक्रीयेच्या वेळी अडचण येणार नाही.

६. शासकीय सेवेत निवड झाल्यावर कार्यालयाची शिफारस घेऊन त्वरीत अर्ज सादर करावा.

७. अनुसूचित जाती किंवा नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी राखीव मतदार संघातून निवडणूकीसाठी नामनिर्देशपत्र सादर करु इच्छीणाऱ्या उमेदवारांनी मा.जिल्हाधिकारी किंवा निवडणुक निर्णय अधिकारी यांची शिफारस घेऊन अर्ज सादर करावेत.

## ❖ सन २०१९-२० ते २०२१-२२ या कालावधीतील जात प्रमाणपत्र पडताळणीकरिता प्राप्त प्रकरणे व निकाली प्रकरणांविषयी माहिती अहवाल

| अ.क्र. | वर्ष | प्रस्तावांचा तपशिल | प्राप्त प्रकरणे संख्या | निकाली प्रकरणे संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २०१९-२० | **शैक्षणिक** | २४०४ | २३३६ |
| | | **सेवा** | २६९ | २५८ |
| | | **निवडणूक** | ५० | ५० |
| | | **इतर** | ०७ | ०३ |
| | | **एकूण** | **२७३०** | **२६४७** |
| २ | २०२०-२१ | **शैक्षणिक** | १४५० | १४१८ |
| | | **सेवा** | १८१ | १७५ |
| | | **निवडणूक** | ३६७ | १८२ |
| | | **इतर** | ०७ | ०३ |
| | | **एकूण** | **२००५** | **१७७८** |
| ३ | २०२१-२२ | **शैक्षणिक** | १७९९ | १७८९ |
| | | **सेवा** | ३४५ | ३३४ |
| | | **निवडणूक** | १८५ | १८५ |
| | | **इतर** | ११ | ११ |
| | | **एकूण** | **२३४०** | **२३१९** |


जात प्रमाणपत्र पडताळणी प्राप्त प्रकरणे व निकाली प्रकरणे
3000
2500
2000
1500
1000
500
0
2019-20
2020-21
2021-22
प्राप्त प्रकरणे संख्या
निकाली प्रकरणे संख्या

**कार्यालयाचा पत्ता :-** सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सिंधुदुर्ग कार्यालय.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,
सिंधुदुर्गनगरी. ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग
पिन कोड - 416 812

**दूरध्वनी क्र :-** 02362-228882

**ई-मेल आयडी :-** acsindhu1501@gmail.com